सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, ०१ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १६० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com





## संक्षिप्त वृत्त...



### परंड्यात संत सेना महाराजांची पुण्यतिथी साजरी

**परंडा, दि.३१ ऑगस्ट -**

शहरातील जय भवानी चौक, काशीद गल्ली येथे नाभिक समाजाच्यावतीने दि.३० रोजी संत सेना महाराजांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी समाजप्रबोधनकार बाळासाहेब घोगरे व डॉ. आनंद मोरे यांचा संत सेना महाराजांच्या जीवनचरित्रावर व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला. पुण्यतिथी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. दुपारी १२ वाजता संत सेना महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करुन पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास नाभिक समाजातील महाराष्ट्र चँपीयन आप्पा काशीद, दिनकर काशीद, युवा नाभिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष नागेश काशीद, प्रकाश काशीद, संतोष भालेकर, विशाल काशीद, सुरेश काशीद, ग्रामसेवक मनोज काशीद, जयंत काशीद, संजय काशीद, नागेश यादव, नागेश डाके, प्रितम डाके, सनी काशीद, रमेश काशीद, राहुल काशीद, गणेश काशीद, सचिन काशीद, प्रभु वाघमारे, अकुंश जमदाडे, बाबी काशीद, शुभम काशीद, ओंकार काशीद आदिसह नाभिक समाजातील महिलावर्ग, समाजबांधवाची मोठी उपस्थिती होती.

### प्रश्नमंजुषा स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**जळकोट, दि.३१ ऑगस्ट -**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ अंतर्गत असलेल्या जळकोट येथील शिवाजी चौकातील श्री कॉम्प्युटर्सच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी स्वातंत्र्य दिनानिमित्त घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेचे विविध शाळेत पारितोषिक वितरण करण्यात आले. महाराष्ट्र ज्ञान महामंडळ आयोजित श्री. कॉम्प्युटरतर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रश्नमंजुषा परीक्षा घेण्यात आली. सदरील ही परीक्षा २० मार्कांची होती. वीस मिनिटे वेळ विद्यार्थ्यांना देण्यात आला होता. परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सहभाग प्रमाणपत्र व शाळेतून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकासाठी विद्यार्थ्याला मेडल पारितोषक स्वरूपात देण्यात आले. पार्वती प्रशालेतील २०० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला होता. शाळेच्या मुख्याध्यापिका लता सोमवंशी, शिक्षक अभिमन्यू कदम, बसवराज मडोळे, विजय मोरे, गुड, कदम, तळेकर तसेच जिल्हा परिषद जळकोट येथेही परीक्षा घेण्यात आली.



### विद्यार्थ्यांचे वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये सुयश

**मंगरूळ, दि.३१ ऑगस्ट -**

जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्रशाला मंगरूळ ता. तुळजापूर येथील विद्यार्थ्यांनी १७ वर्षाखालील विविध वजनी गटांमध्ये नेत्रदीपक यश संपादन केले असून त्यांची नांदेड येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्रियंका विजय साळुंखे हिने ४९ किलो वजनी गटात प्रथम तर वसुधा रामेश्वर हजारे हिने ५९ किलो वजनी प्रथम व मुलांमध्ये अथर्व ज्ञानेश्वर पाटील याने ६७ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवलेला असून श्रेयस संजय कोरेकर याने ६१ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक पटकावला. प्रथम क्रमांक आलेल्या तीन विद्यार्थ्यांची निवड नांदेड येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी झालेली आहे. या सर्व स्पर्धकांना प्रशालेचे मुख्याध्यापक शिवाजी राठोड, सहशिक्षक फुगारे, तनपुरे, राऊत, वाघमोडे, आशिष साठे, सरडे, वाघचौरे, दरेकर तसेच पोतदार व कापसे यांचे मार्गदर्शन लाभले.



### जि.प. प्रशालेचा व्हॉलीबॉल संघ विजयी

**शिराढोण, दि.३१ ऑगस्ट -**

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर क्रीडा संकुल डिकसळ (ता. कळंब) येथे तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत पीएमश्री भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय आदर्श जि.प. प्रशाला शिराढोण येथील १७ वर्षे वयोगटातील मुलांचा संघ प्रथम क्रमांकाने विजयी झाला. जिल्हास्तरावर निवड झाल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सुनील अहिरे, सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, पालक, गावातील नागरिकांनी सर्व टीमचे अभिनंदन केले.

# नाभिक समाज भक्तनिवास लवकरच उभारू : आ. राणाजगजितसिंह पाटील



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ ऑगस्ट-**

नाभिक समाज हा सामाजिक बांधिलकीसह सेवाभाव जपणारा असून तुळजाई नगरीत कुंभार गल्लीतील नियोजित जागेवर लवकरच सुसज्ज असे भक्तनिवास उभारून राज्यभरातील नाभिक बांधवांसाठी हक्काची व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याने मत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले.

तसेच गतवर्षी १० लाख आणि आता यावर्षी १५ लाख रुपये आमदार निधीतून याकामी उपलब्ध देणार असा आशावाद आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी समाजभूषण पुरस्कार प्राप्त शहाजी कावरे व अनिल आगलावे यांचा आमदार पाटील यांनी सत्कार केला.

तुळजाई नगरीत श्री संत शिरोमणी सेना महाराज पुण्यतिथी सोहळा निमित्ताने नाभिक समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारासह नाभिक समाजरत्न पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

कुंभार गल्ली कार पार्किंग शेजारील श्री संत सेना महाराज सांस्कृतिक सभागृहाच्या नियोजित जागेवर गुरुवार २९ रोजी सायंकाळी ६ वाजता महंत तुकोजी बुवा, महंत मावजीनाथ बाबा यांच्या प्रमुख उपस्थितीत सेना महाराज मुर्ती प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

शुक्रवार ३० रोजी अनिकेत राऊत महाराज यांची काल्याचे किर्तनसेवा संपन्न झाली, दुपारी महाप्रसादानंतर सायंकाळी ४ वाजता अमर चोपदार, श्रीकांत कदम, सचिन ताकमोघे यांच्या हस्ते आरतीने पुण्यतिथी सोहळ्याची सांगता झाली.

याप्रसंगी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, अशोक जगदाळे, धीरज पाटील, सचिन रोचकरी, विनोद गंगणे, आनंद कंदले, अभिजित चव्हाण, ऋषीकेश मगर, अमर चोपदार, अविनाश गंगणे, राम चोपदार, अमर हंगरगेकर, विजय कंदले, अमोल कुतवळ, नरेश अमृतराव, अजित परमेश्वर, विशाल रोचकरी आदींसह नाभिक बांधवांची उपस्थिती होती.

**नाभिक समाजभूषण पुरस्काराचे मानकरी...**

पत्रकार अनिल आगलावे, नायब तहसीलदार मनोरमा प्रकाश गाढे, शिक्षण विस्तार अधिकारी मल्लिनाथ काळे, निवृत्त बँक कर्मचारी शहाजी बडोदकर यांना यंदाचा नाभिक समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## लहू कदम मित्र परिवारातर्फे विलास राठोड यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.३१ ऑगस्ट-**

जळकोट येथील सामाजिक कार्यकर्ते श्री. लहूजी कदम मित्र परिवारातर्फे भाजपचे तालुका सरचिटणीस व आलियाबाद ग्रामपंचायत माजी सदस्य श्री. विलास राठोड यांची संत सेवालाल महाराज तांडा सुधार समृद्धी योजनेच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीवर अशासकीय सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

## श्री मल्लिकार्जून मंदिरात शरण चरित्र अमृता कार्यक्रमाची उत्साहात सांगता

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ ऑगस्ट-**

पवित्र श्रावण मासा निमित्त नळदुर्ग येथील प्रसिद्ध श्री मल्लिकार्जुन मंदिरामध्ये एक महिनाभर सुरु असलेल्या शरण चरीत्र अमृता या कार्यक्रमाची समाप्ती दि.३० ऑगस्ट रोजी मोठया उत्साहात व आनंदात करण्यात आली.

श्री मल्लिकार्जुन मंदिरामध्ये पवित्र श्रावण मासा निमित्त दररोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत श्री शिवबसव देवरु यांचे शरण चरीत्र अमृता या विषयावर प्रवचनाचा कार्यक्रम पार पडला. या प्रवचन कार्यक्रमास नळदुर्ग शहरातील वीरशैव बंधु भगिनी मोठया संख्येने उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढविण्याचे काम केले.

महिनाभर सुरु असलेल्या या प्रवचन कार्यक्रमाची समाप्ती दि.३० ऑगस्ट रोजी मल्लिकार्जुन मंदिरामध्ये मोठया उत्साहात व आनंदात करण्यात आली. यावेळी श्री शिवलिंगेश्वर मठाचे मठाधीपती श्री ष. ब्र. बसवराज शिवाचार्य महास्वामीजी, श्री प्रभु देवरु, श्री बसव देवरु व शामा प्रसाद महाराज या सर्वांचे आशिर्वचन झाले.

या कार्यक्रमास वीरशैव बंधु भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर महाप्रसाद होऊन कार्यक्रमाची समाप्ती करण्यात आली.

## व्यापारी महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी लक्ष्मीकांत जाधव, सचिवपदी वडगावकर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑगस्ट-**

कॉन्फरेडेशन ऑफ ऑल इंडिया आणि महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स न्ड ग्रिकल्चर संलग्नित असलेल्या धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघाच्या अध्यक्षपदी लक्ष्मीकांत जाधव यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सचिवपदी महेश वडगावकर,संघटन सचिव अभिलाष लोमटे यांची तर राज्य सचिवपदी संजय मोदाणी, उपाध्यक्षपदी संजय मंत्री यांची एकमताने निवड झाली आहे.

कॉन्फरेडेशन ऑफ ऑल इंडिया संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बी.एस. भरतीया, राष्ट्रीय महामंत्री खासदार प्रवीण खंडेलवाल, महाराष्ट्राचे अध्यक्ष सचिन निवंगुणे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुण्यात शुक्रवारी (दि.३०) व्यापारी महासंघाची राज्यस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत व्यापाऱ्यांच्या वेगवेगळ्या समस्यांबद्दल व्यापक चर्चा करण्यात आली.

त्यानंतर प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत धाराशिव जिल्ह्याच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्यानुसार लक्ष्मीकांत जाधव यांची धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघाचे नूतन जिल्हाध्यक्ष म्हणून एकमताने निवड जाहीर करण्यात आली. तसेच महेश वडगावकर यांची जिल्हा सचिव, अभिलाष लोमटे यांची संघटन सचिव म्हणून निवड करण्यात आली. संजय मोदाणी यांची महाराष्ट्र सचिवपदी तर संजय मंत्री यांची महाराष्ट्र उपाध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली.

यावेळी संजय मोदाणी, राजाभाऊ काळे, कपिल शर्मा, संग्राम शिंदे, अभिजीत थिटे, मनोज कोचेटा, शामभाऊ भन्साळी, शैलेश मेहता, धनंजय जेवळीकर, नितीन फंड, नितीन भन्साळी, अमित मोदाणी, प्रशांत कोनारडे, मंगेश वैजापूरे, संतोष कुलकर्णी, अझहर खान, बापू शिंगाडे, जगदीश मोदाणी, विशाल थोरात, शाम बजाज यांची उपस्थिती होती.

## डेंग्यु रोगास प्रतीबंधात्मक उपाययोजना तात्काळ करा : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑगस्ट-**


धाराशिव जिल्हयातील डेंग्यु रोगाचा प्रसार मोठया प्रमाणात झाला असल्याकारणाने रुग्णांचे प्रमाण जिल्हयाभरात दिवसेंदिवस वाढत चालले आहे. डेंग्यु व डेंग्यु सदृष्य आजारामुळे जिल्हयातील अनेक नागरीक सातत्याने आजारी पडत आहेत. या साथ रोगास प्रतीबंधात्मक उपाययोजना करुन अटकाव करणे गरजेचे आहे.

या संदर्भाने खा. ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी जिल्हाधिकारी धाराशिव यांना धाराशिव जिल्हयातील डेंग्यु रोगास प्रतीबंधात्मक उपाययोजना तात्काळ करणेबाबत पत्राव्दारे सुचीत केले आहे.

या पार्श्वभुमीवर उमरगा तालुक्यातील ओम साळुंके व सत्यजित देशमुख या दोन शालेय विद्यार्थ्यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे.

धाराशिव जिल्हयातील डेंग्यु साथ रोगास प्रतीबंधात्मक उपाय योजना करणेबाबत मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, धाराशिव व जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रुग्णालय धाराशिव यांना प्रतीबंधात्मक उपाययोजना करुन शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी व गावोगावी औषध फवारणी तसेच इतर प्रतीबंधात्मक उपाययोजना करणेबाबत पत्राव्दारे खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्याकडून कळविण्यात आले आहे.

## अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सास्तुर येथे मिरवणुक



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.३१ ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील सास्तुर येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणुक काढण्यात आली.

यावेळी साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन भाजपाचे युवा नेते नऊस राहुल पाटील व जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष श्रीनिवास जाधव यांच्या हस्ते करुन साठे समाज मंदिरापासून मिरवणुकीत सुरुवात सुरुवात करण्यात आली. यावेळी गरीब होतकरू विद्यार्थ्यांना युवा नेते नऊस राहुल पाटील यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी किसन सरवदे, राहुल सरवदे, अजय जाधव, विजय जाधव, लालू सरवदे, लक्ष्मण चिमुकले, बालाजी चिमुकले, राजू सरवदे, छगन सरवदे, राजू साठे, बबन शिंदे, आकाश चिमकुले, शिवाजी चिमुकले, माधव गायकवाड, दत्ता गायकवाड, आशिष वाघमारे, मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समाज बांधव उपस्थित होता.

## जल संजीवनी प्रकल्पाकडून मत्स्यपालनासाठी प्रोत्साहन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.३१ ऑगस्ट-**

युनायटेड वे मुंबई संस्थेच्या जल संजीवनी प्रकल्पा अंतर्गत शेतकऱ्यांना मत्स्यपालनासाठी प्रोत्साहन म्हणून मत्स्यबीज आणि खाद्य वाटप करण्यात आले. प्रकल्प कार्यक्षेत्रातील ६ शेतकऱ्यांना याबाबतचे सहाय्य करण्यात आले आहे. या सहा शेतकऱ्यांना या आधी शेततळे आणि अस्तरीकरणासाठी ही प्रकल्पाकडून अर्थसहाय्य करण्यात आले आहे. मत्स्यपालनासाठी लागणारे सर्व मार्गदर्शन जल संजीवनी टीमकडून या शेतकऱ्यांना देण्यात आले आहे.

संशोधनात्मक असलेला हा प्रकल्प लोहारा तालुक्यातील मार्डी, नागराळ, उंडरगाव, हिप्परगारवा तर तुळजापूर तालुक्यातील कार्ला आणि वानेगाव या गावांमध्ये सुरू आहे. हवामान आधारित शेती बरोबरच शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पादन स्त्रोत निर्माण व्हावा या अनुषंगाने जल संजीवनी प्रकल्पा अंतर्गत मत्स्यपालनासाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे.




संशोधनावर आधारित असलेल्या जल संजीवनी प्रकल्पा अंतर्गत पुर्नजीवी शेती, शून्य किंवा अल्प मशागत, सेंद्रीय शेती आदि बाबीवर मार्गदर्शन आणि अर्थसहाय्य करण्यात येत आहे.

जल संजीवनी कृषीतज्ञ टीम शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करीत असून अभ्यास भेटी, प्रशिक्षण यामुळे

शेतकरी आपल्या बांधावर सेंद्रिय निविष्टा तयार करून प्रकल्पामध्ये सक्रीय सहभाग घेत आहे.

# उमरगा-लोहारा भागातील उगवता तारा : ॲड. शीतल चव्हाण

समाजातून अनेक तरुण नेतृत्व म्हणून पुढे येताना आपण पाहतो. पण यातील बहुतांश तरुण हे आमदार, खासदार, मंत्री अशा प्रस्थापित कुटुंबातून असतात. सर्वसामान्य कुटुंबातील तरुण शिक्षण, नोकरी, लग्न, प्रपंच अशा चक्रात अडकलेला असताना प्रस्थापित कुटुंबातील तरुण क्रिकेट टोर्नामेंट्स, बॅनरबाजी, वाढदिवसाचे इव्हेंट्स, दानधर्म अशा माध्यमातून नेतृत्व म्हणून झळकतात असे सर्वसाधारण चित्र सामान्यत: दिसून येते. पण मागास समजल्या गेलेल्या मराठवाड्यातील उमरगा-लोहारा परिसरात ॲड. शीतल चव्हाण या तरुणाने या परिस्थितीला वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व या तिन्ही पातळ्यांवर सक्षम कार्य करुन अपवाद निर्माण केलेला दिसून येतो.

सध्याच्या युगात तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे झुकलेली आहे. मराठवाड्यातील लातुर-धाराशिव परिसरातील तरुणांमध्ये तंबाखू, सुपारी खाण्याचे व्यसन खुप मोठ्या प्रमाणावर जडले आहे. त्यातल्या त्यात धाराशिव जिल्ह्यात उमरगा तालुक्यातील गाव, वाड्या-वस्त्या व गल्ली-बोळांमध्ये किमान दोन-तीन पानटपरी तेजीत असलेल्या दिसून येतील. या व्यसनांध पानटपरीला छेद देण्याच्या उद्देशाने उमरगा तालुक्यातील एका युवकाने 'पान टपरी नव्हे, ज्ञान टपरी' असे ब्रीद घेवून वाचनटपरी उभारण्याचा संकल्प केला हा संकल्प पुर्णत्वास नेऊन वाचन टपरी ही संकल्पना सत्यात उतरवली.



या संकल्पनेला सत्यात उतरवल्याने राज्यभरात चर्चेचा विषय झालेल्या तरुणाचे नाव आहे. ॲड. शितल चव्हाण...!

जडणघडण व्यवसायाने वकील असलेल्या ॲड. शितल चव्हाण यांचा जन्म २ एप्रिल १९८६ रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड या शहरात झाला. त्यांचे मुळ गाव उमरगा तालुक्यातील मुळज हे असून त्यांचे वडील सिल्लोड येथील यशवंत महाविद्यालयात राज्यशास्त्राचे प्राध्यापक होते. वडीलांचे छत्र वयाच्या तिसऱ्या वर्षी गमावल्याने त्यांना आजोळी म्हणजेच उमरगा तालुक्यातील माडज या गावी रहायला यावे लागले. आईचे वडील कॉ. रामराव गायकवाड हे हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक होते. ते भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते आणि ग्रामीण भागात सहकाराचे धोरण राबविण्यासह शेतकरी, कष्टकऱ्यांसाठी लढणारे झुंजार नेते होते. आजोबांच्या कम्युनिस्टवादी विचारांचा प्रभाव बालवयातच शीतलवर पडला. आजही डाव्या-पुरोगामी विचारांचा प्रभाव त्यांच्या लिखाण, वक्तृत्व आणि कार्यातून ठळकपणे जाणवतो तो बालवयात झालेल्या आजोबांच्या संस्कारामूळे आणि पुढे वाचनाच्या माध्यमातून त्यांनी या संस्काराला विकसित केल्यामूळे वडिलांच्या निधनामूळे दोन वर्ष आजोळी राहिल्यानंतर आपल्या मुलांना चांगले शिक्षण देता यावे या हेतूने शीतल यांच्या आईने तिन्ही भावंडांना उमरगा शहरात आणले. तिथे वडिलांनी अर्धवट बांधलेल्या घराचे काम आईने पूर्ण केले व त्या घरात हे कुटुंब राहू लागले. त्यांच्या कुटूंबाला त्यांच्या आजोबाचा खुप मोठा आधार होता. परंतू शीतल पाचवीला असताना आजोबांचे म्हणजेच आईचे वडील स्वातंत्र्यसैनिक कॉ. रामराव गायकवाड यांचे छत्रही त्यांच्या निधनामूळे हरवले.

ॲड. शितल चव्हाण यांचे बालवाडी ते तिसरी पर्यंतचे शिक्षण उमरगा शहरातील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयात झाले. त्यानंतरचे शिक्षण उमरगा शहरातील श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या आदर्श विद्यालयात झाले. आदर्श विद्यालयात त्यावेळी काही शिक्षक अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ मोठ्या जोमाने चालवित होते. पुस्तकांच्या रुपानेही या चळवळीमधून जनजागृती होत होती. शीतल सहावीत असताना या चळवळीतील वैज्ञानिक जाणीवा प्रकल्पांतर्गत काही पुस्तिका त्यांनी वाचल्या आणि तिथूनच वाचण्याची गोडी लागली. शाळेत नाटके, पथनाट्ये, वक्तृत्व स्पर्धा यामध्ये शीतल हिरीरीने सहभाग घेत असत. शाळेतल्या वाचनालयातील पुस्तके घेवून, ती वाचून स्वत:च भाषणे लिहित असत. नववी, दहावीला असताना साहीत्याची गोडी वाढत गेली. स्वतः कविता लिहणे, प्रवास वर्णन लिहणे, पथनाट्ये लिहिणे यातून साहीत्य लिहण्याचा छंद लागला. दहावीनंतर शीतल यांचा वाचनाचा वेग वाढला, दिवसेंदिवस वाचनाची भुक वाढू लागली. नवनवीन पुस्तकांचा शोध घेणे सुरु झाले आणि वाचनाची सवय वृध्दिंगत होत गेली. मराठा सेवा संघ, गुरु रविदास सत्यशोधक समाज यांच्या कार्यक्रमांना शीतल जावू लागले. फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचे साहित्य वाचण्यावरचा भर वाढला. आजोबा कम्युनिस्टवादी विचारसरणीचे होते, सहाजिकच त्यांच्या विचाराचा प्रभाव असल्याने कम्युनिस्ट पक्षाचे कार्यालय शोधले आणि ऑल इंडिया स्टुडन्ट फेडरेशन या विद्यार्थी संघटनेत शीतलने कुमार वयात दोन वर्ष काम केले. अनेक विद्यार्थी आंदोलनांत आणि उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवला. ११ वी व १२ वीचे शिक्षण उमरगा शहरातील भारत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयात घेतले. विज्ञान शाखेत असूनही सामाजिक कार्याची, वाचनाची ओढ काही कमी होत नव्हती. त्यामुळे १२ वी नंतर समाजाशी, कायदे निर्मितीच्या प्रक्रियेशी संबंधित असलेले वकीलीचे शिक्षण घेण्याचे ठरवले. 'लॉ' चे शिक्षण घेण्यासाठी थेट पुणे गाठले. पुणे हे शिक्षणाचे आणि सांस्कृतिचे माहेरघर असलेले शहर असल्याने सहाजिकच पुण्यातील साहित्य, कला व चळवळ या क्षेत्रांशी निगडीत व्यक्तींच्या गाठी-भेटी वाढत गेल्या. पुण्यात असतानाही महाविद्यालयीन जीवनात वाचनाची ओढ होतीच. स्वत:ला केवळ वाचनापुरते मर्यादित न ठेवता व्यक्त होण्यावरही शीतल यांनी भर दिला. लिखाण, अभिनय, वक्तृत्व याशी संबंधित विविध स्पर्धामध्ये सहभागी होत त्या यशस्वीरीत्या पार पाडल्या. डाव्या चळवळीतील लेखिका सुलभाताई ब्रह्मे यांच्याशी सातत्याने संपर्कात राहिल्याने महाविद्यालयीन काळातही कविता आणि स्फूट लिखाण केले. सन २००९ साली 'एल.एल.बी' चे शिक्षण पुर्ण केले. पुढे 'ज्युनिअरशीप' करीतच 'एल.एल.एम' चे शिक्षण पुर्ण केले. ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनच्या माध्यमातून सामजिक कार्य, आंदोलने शीतल चव्हाण यांचे सामाजिक कार्य आणि वाचनालये या निमित्ताने अनेक लोक त्यांच्याशी निस्वार्थ भावनेने जोडले गेले. या सर्वांनी एकत्र येवून ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशन ही संस्था स्थापन केली. सत्यनारायण जाधव, व्यंकट ऊर्फ राजू भालेराव, किशोर औरादे, करीम शेख, राजू बटगिरे, ॲड. ख्वाजा शेख, धानय्या स्वामी, प्रदिप चौधरी, माधव ऊर्फ दादा माने, किशोर बसगुंडे, बबिता मदने, अनुराधा पाटील, शशी पाटील, संतोष चव्हाण, माधव चव्हाण, संगिता सुर्यवंशी, रवी सांगवे, निसार औटी, विजय चितली, सिद्राम जमादार, प्रविण वडगाव, सुरज पाटील अशी समाजातील अनेक सुज्ञ मंडळी शीतल चव्हाण यांच्या विचार व कार्याने प्रभावित होवून त्यांच्यासोबत सक्रियपणे कार्यरत आहे. प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण स्मृती वाचनालयाच्या माध्यमातून वाचन संस्कृती रुजवण्याचे तर ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक विषयांना वाचा फोडण्याचे काम उमरगा-लोहारा परिसरात अविरतपणे सुरु आहे.

उमरगा-लोहारा परिसरातील वीज, पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, रोजगार, शिक्षण अशा सर्व विषयांवर फाऊंडेशनने आजवर भरीव कार्य केलेले आहे.

... शब्दांकन ...
**आकाश पोतदार**
उमरगा तालुका प्रतिनिधी : दै. तरूण भारत

## अग्रलेख...

# पन्नाशी पार केलेली बालबुद्धी

काँग्रेस पक्षात आजपर्यंत अनेक नेते होऊन गेले. यातील सगळ्याच नेत्यांना लोकप्रियता मिळाली, जनतेने त्यांना मनापासून स्वीकारले, असे म्हणता येणार नाही. यातील अनेक नेत्यांना निवडणुकीत विजयीही होता आले नाही. काही नेत्यांवर तर भ्रष्टाचाराचे आरोप झाले; मात्र जनतेने त्यांना स्वीकारले नसले, तरी पूर्णपणे नाकारलेही नाही, त्यांची टिंगलटवाळी कधी केली नाही. विदूषक म्हणून त्यांच्याकडे पाहिले नाही. देशातील आजवरच्या राजकारणात काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची जेवढी टिंगलटवाळी झाली, तेवढी ती देशातील कोणत्याच पक्षाच्या नेत्याची झाली नाही. अगदी ज्यांच्या निष्ठा या देशावर नाही, असे ज्यांच्याबद्दल बोलले जाते, त्या डाव्या पक्षांच्या नेत्यांचीही झाली नाही. राजकारणातील ज्या व्यक्तीला काय बोलावे, यापेक्षा काय बोलू नाही, हे समजते, तो यशस्वी होतो. पण राहुल गांधींना हे कधीच समजले नाही. याचे एकमेव कारण म्हणजे त्यांना काय बोलावे आणि काय बोलू नये हे कळत नाही. मात्र, तरीही बोलायची खूप हौस आहे. जे बोलायचे ते राहुल गांधी बोलत नाही आणि जे बोलायला नको, ते मात्र बोलून जातात. राहुल गांधी राजकारणात यशस्वी झाले नाही, त्यांना देशातील जनतेने गांभीर्याने घेतले नाही, याचे कारण याच्यातच दडले आहे. काँग्रेसेतर पक्षांचे सोडा; पण काँग्रेसचे नेतेही त्यांना गांभीर्याने घेत नाहीत. राहुल गांधी जवळपास २० वर्षांपासून राजकारणात सक्रिय आहेत, पण आपल्या नेतृत्वात त्यांना काँग्रेस पक्षाला लक्षणीय असे यश कधीच मिळवून देता आले नाही. आपल्या विधानांनी आणि वर्तनाने राहुल गांधी देशातील जनतेची करमणूक मात्र नेहमीच करत असतात. त्यामुळेच जनमानसात त्यांची 'पप्पू' अशी प्रतिमा निर्माण झाली. ही प्रतिमा खोडून काढण्यासाठी त्यांनी फारसे गंभीर प्रयत्न केले नाहीत; उलट आपल्या बालिश विधानांनी आणि नाटकी वर्तनाने या प्रतिमेला हातभार लावण्यातच धन्यता मानली. त्यामुळे राहुल गांधींवर समाजमाध्यमाद्वारे जेवढे मीम्स आणि विनोद तयार झाले, तेवढे आतापर्यंत देशातील सर्व नेत्यांवर मिळूनही तयार झाले नाही. एवढ्या एका बाबतीत तरी त्यांनी देशातील सर्व पक्षांच्या नेत्यांना मागे टाकले, हे मान्य करावे लागेल.

राहुल गांधी कधी काय बोलतील, याचा भरवसा राहिला नाही. आपण काय बोलतो, जे बोलतो ते तर्कसंगत आहे का, याचा विचार ते कधीच करत नाहीत. 'उथलती जीभ लावली टाळ्या' या पद्धतीने राहुल गांधी एकामागे एक विधाने करीत असतात. आपल्या विधानाचा जनमानसावर काय परिणाम होतो, आपण केलेली विधाने लोकांना पटतात का, याच्याशी त्यांना काहीच देणेघेणे नसते. त्यामुळेच राहुल गांधींच्या कोणत्याही विधानांना देशातील जनता गांभीर्याने घेत नाही. मुळात गांधींचे आणि राहुल गांधी यांचा दूरदूरपर्यंत काही संबंध नाही. राहुल गांधी यांनी जातीय जनगणनेची मागणी लावून धरली आहे. आपल्या या मागणीचा समाजमनावर आणि देशाच्या एकता आणि अखंडतेवरही काय परिणाम होतो, होईल, याचा विचार त्यांनी कधी केला नाही. आपल्या पक्षाच्या छटाकभर राजकीय फायद्यासाठी देशाला जातीय संघर्षाच्या वणव्यात ढकलायलाही ते मागेपुढे पाहात नाही. देशात सुदैवाने भाजपाची सत्ता असल्यामुळे तसेच नरेंद्र मोदींसारखा पोलादी नेता सलग दहा वर्षांपासून पंतप्रधानपदी असल्यामुळे या मागणीचा नकारात्मक परिणाम देशावर झाला नाही, हे देशाचे भाग्य म्हटले पाहिजे. जातीय जनगणनेची मागणी पुढे रेटताना राहुल गांधी यांनी आजपर्यंत जी विधाने केली, ते पाहून चेहऱ्यावरची माशी न हलणाऱ्या माणसालाही खदखदून हसू आल्याशिवाय राहात नाही. दलित, आदिवासी आणि ओबीसींना आरक्षण मिळावे याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. गेल्या जवळपास ७० वर्षांपासून देशातील शोषित, पीडित आणि वंचित वर्गाला आरक्षण मिळत आहे. मात्र भाजपा सरकार आरक्षण बंद करणार, असा खोटा प्रचार काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी लोकसभा निवडणुकीत जाणीवपूर्वक केला. त्याचा काही प्रमाणात भाजपाला फटका बसला. त्यामुळे राहुल गांधींचा उत्साह वाढला आणि ते वाटेल ते बोलू लागले, म्हणण्यापेक्षा बरळू लागले. अर्थसंकल्प छपाईला पाठवताना नॉर्थ ब्लॉकमधील अर्थमंत्रालयात दरवर्षी हलवा समारंभ होत असतो. ही परंपरा अतिशय जुनी आहे. देशात काँग्रेसचे शासन असतानाही हलवा समारंभ होत होता. पण यावेळी हलवा समारंभात जे अधिकारी सहभागी झाले, त्यात एकही दलित, ओबीसी आणि आदिवासी अधिकारी नव्हता, असा जावईशोध आजपर्यंत स्वतः कधीच जावई होऊ न शकलेल्या राहुल गांधींनी लावला. त्याआधी केंद्र सरकारच्या सचिवांमध्ये दलित, ओबीसी आणि आदिवासी समाजाचे सचिव नाही, असा आरोपही त्यांनी केला होता. मध्यंतरी एकदा काँग्रेस मुख्यालयात पत्रपरिषद घेत असताना पत्रकारांमध्येही ओबीसी पत्रकार किती आहेत, असा हास्यास्पद प्रश्न त्यांनी विचारला होता.

मुघलांच्या घोड्यांना पाण्यात संताजी धनाजी दिसायचे, असे म्हटले जात होते. तसेच राहुल गांधींना जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी दलित, ओबीसी आणि आदिवासी दिसत असतात. राहुल गांधींची कावीळ झाल्यासारखी स्थिती आहे. नुकतेच त्यांनी केलेले ताजे विधान आणि त्याआडून केलेली मागणी पाहून शहाण्या माणसाने आपले डोके दगडावर आपटायची इच्छा झाली, तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आजपर्यंत देशात झालेल्या मिस इंडिया स्पर्धेत एकही दलित, ओबीसी आणि आदिवासी समाजाच्या तरुणीची निवड झाली नाही, म्हणजे तेथे तिला बक्षीस मिळाले नाही, असे आश्चर्यकारक विधान त्यांनी केले. कदाचित, देशात दलित आणि आदिवासी समाजाची एकही महिला मिस इंडिया झाली नसेल, पण देशाच्या सर्वोच्च अशा राष्ट्रपतिपदी एक महिला द्रौपदी मुर्मू आहेत, याचाही त्यांना विसर पडला, असे दिसते. यामुळेच केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी राहुल गांधींचा उल्लेख 'बालबुद्धी' असा केला आहे. मेघवाल यांनी राहुल गांधींसाठी बालबुद्धी असा जो शब्द वापरला, तो गेल्या अनेक दिवसांपासून राहुल गांधींची वागणूक पाहून देशातील लोकांच्या डोक्यात घुमत होता. मेघवाल यांनी त्यावर शिक्कामोर्तब केले. उद्या राहुल गांधींनी देशासाठी खेळणाऱ्या क्रिकेट संघात एकही दलित, ओबीसी आणि आदिवासी नाही, असा आरोप केला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. दलित, ओबीसी आणि आदिवासींचा एवढा पुळका राहुल गांधींना आता आपली सत्ता गेल्यावर येत आहे. २००४ ते २०१४ आणि त्यांच्याही आधी म्हणजे १९९९ पर्यंत एखाददुसरा अपवाद वगळता देशात काँग्रेसचीच सत्ता होती; मग त्यावेळी त्यांनी मंत्रिमंडळात या समाजाला पुरेसे प्रतिनिधित्व का दिले नाही, असा प्रश्न त्यांना विचारायला हरकत नाही. काँग्रेस पक्ष दहा वर्षांपासून सत्तेपासून दूर असल्यामुळे त्याला आता दलित, ओबीसी आणि आदिवासी यांचा पुळका येत आहे. असा कोणाचा समज झाला तर त्याला दोष कसा द्यायचा? या तिघांसोबत राहुल गांधींना मुस्लिम समाजाचा उल्लेख करायचा आहे, पण देशातील हिंदुत्वाच्या लाटेमुळे त्यांची तेवढी हिंमत होत नाही, असे दिसते. अन्यथा त्यांनी मुस्लिम समाजावर अन्याय होत असल्याचा आरोप करायलाही मागेपुढे पाहिले नसते. राहुल गांधी हे काँग्रेस पक्षासाठी 'असून अडचण नसून खोळंबा' अशी स्थिती आहे. राहुल गांधी काँग्रेस पक्षाला एक पाऊल पुढे नेतात आणि दोन-तीन पावलं मागे आणतात. राहुल गांधींची वागणूक पाहून त्यांना खपवून घेत असल्याबद्दल काँग्रेसजनांच्या संयमाचे, हिंमतीचे आणि समजदारपणाचे कौतुक करावेसे वाटते. आचार्य अत्रे आज असते, तर त्यांनी राहुल गांधींसारखा (दिवटा) नेता मागील दहा हजार वर्षांत झाला नाही आणि पुढील दहा हजार वर्षांत होणार नाही, असे विधान निश्चितच केले असते.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# शरद पवारांची शपथ नेमकी कशासाठी?

शरद पवारांनी, महाराष्ट्राचा मणिपूर होऊ शकतो, असे वक्तव्य केले होते. त्यावर उत्तर देताना मनसे प्रमुख राज ठाकरे म्हणाले होते की, महाराष्ट्राचा मणिपूर करण्यात शरद पवारांनी हातभार लावू नये. राज ठाकरे यांचे काका बाळासाहेब ठाकरे शरद पवारांचे मित्र होते. मात्र, त्यांनी राजकीय मंचावरून पवारांचा विरोधच केला आणि पवारांवर विश्वास ठेवता येत नाही, असे ते म्हणाले होते. शरद पवारांबद्दल राजकीय वर्तुळात भीती असली, तरी ती आदरयुक्त भीती नसून त्यांच्या राजकीय कारस्थानाबद्दलची भीती आहे, असं दुर्दैवाने म्हणावं लागतं. त्यांना स्वतःला 'जाणता राजा' म्हणवून घ्यायला आवडतं, पण त्यासाठी त्यांना विशेष प्रयत्न करावेसे वाटत नाहीत. आता बदलापूरच्या प्रकरणावरून शरद पवार निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा एकदा पावसात भिजले. त्यांनी पावसासोबतही आघाडी केली आहे की काय, असा प्रश्न आपल्या मनाला पडू शकतो. यावेळी शरद पवारांनी एक शपथ घेतली आणि उपस्थित लोकांनाही शपथ घ्यायला लावली. महिलांचं रक्षण करण्याची ही शपथ होती. याबाबत शरद पवार यांचं अभिनंदन केलं पाहिजे. हा चांगलाच निर्णय आहे. कारण, महिलांचं रक्षण झालंच पाहिजे, त्यांना सुरक्षा मिळालीच पाहिजे, त्यांच्यावरील अन्याय थांबलेच पाहिजेत. याबाबत दुमत असण्याचं कारण नाही. द्रौपदीचं वस्त्रहरण झालं. त्यानंतर भीमाने दुःशासनाची छाती फाडली आणि त्याच्या रक्ताने द्रौपदीने आपले केस धुतलेले आहेत. महिलांचं रक्षण करणं, त्यांना मान देणं ही हिंदू संस्कृती आहे.

काहीच वर्षांपूर्वी बेस्ट सीएम उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते तेव्हा कोविड सेंटरमध्ये एका महिलेवर बलात्कार झाला होता. अशा अनेक घटना घडल्या होत्या. मात्र, त्यावेळी पवार उद्धव ठाकरेंना शपथ द्यायला विसरले. २०१३ मध्ये शक्ती मिल बलात्कार प्रकरणाच्या वेळी आर. आर. पाटील हे गृहमंत्री होते, पण त्यावेळी पाटलांना शपथ देण्याची आठवण पवारांना झाली नाही. आघाडीचे सरकार असताना साकीनाका, परळी, बीड अशा अनेक ठिकाणी महिलांवर अनेकदा अत्याचार झाले होते. पण पवारांना त्यावेळी महिलांची सुरक्षा महत्त्वाची वाटली नाही. कारण या विषयावरून त्यांना त्यांची राजकीय पोळी भाजता येणार नव्हती का? बरं, पवारांनी ज्या लोकांना शपथ दिली आहे, ते महिलांचे रक्षक आहेत का? जितेंद्र आव्हाड यांचा महिलेविषयीचा ऑडिओ सध्या चांगलाच गाजतोय. अनंत करमुसेला केलेली मारहाण, त्यामुळे त्यांच्या दोन लहान मुली आणि पत्नीला झालेला मनस्ताप पवार विसरले आहेत का? मागे आव्हाडांवर एका महिलेने विनयभंगाचा आरोप केला होता; तो विनयभंग नसला, तरी त्यांनी त्या महिलेशी चांगली वर्तणूक केली नव्हती. कळव्याला मुख्यमंत्री शिंदेंना भेटण्यासाठी जी महिला जात होती, तिचे दोन्ही खांदे दाबून 'काय उभी आहेस, बाजूला हो' म्हणत तिला ढकललं, अशी तक्रार त्या महिलेने केली होती. त्या महिलेला बाजूला ढकलून अपमान करणारे आव्हाड एवढे कोण मोठे लागून गेले? त्यांना महिलांशी अशी वर्तणूक करण्याचा अधिकार कोणी दिला? ते आमदार झाले म्हणजे काय त्यांनी महाराष्ट्र विकत घेतला का? ते संविधानापेक्षा, कायद्यापेक्षा खूप मोठे आहेत का? याविषयी शरद पवारांचे काही मत आहे का? या मोर्चात संजय राऊत हे मुंबईतून सहभागी झाले होते. संजय राऊत यांची महिलांविषयीची गलिच्छ, घाणेरडी वक्तव्ये सर्वश्रुत आहेत. ते महिलांना उघडपणे शिव्या देतात. विचार करा, खाजगीत काय काय बोलत असतील? स्वतः सुप्रिया सुळे कोलकाता बलात्कार प्रकरणात 'अशा गोष्टी होत असतात' असं म्हणाल्या होत्या. महिलांचा अपमान करणाऱ्या अशा लोकांना घेऊन पवार महिलांचं संरक्षण करणार आहेत का? मग पवारांनी घेतलेली ही शपथ महिलांच्या सुरक्षेसाठी होती की फडणवीसांना महाराष्ट्रातून घालवण्यासाठी होती? असा दुर्गंध आपल्याला येऊ लागतो. मराठा आरक्षण इत्यादी मुद्दे सोडून पवार अचानक महिलांच्या सुरक्षेकडे कसे वळले? की आरक्षणावरून रान पेटवून झालेलं आहे.

राजकोट किल्ल्यावरील महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला. यावरून आता पवारांनी राजकारण सुरू केले आहे. ही घटना दुर्दैवीच आहे. याविषयी सखोल चौकशी होऊन कारवाई झालीच पाहिजे. मात्र, आता आघाडी हा मुद्दा चिघळण्याचा व यावरून राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे. महाराष्ट्राचा मणिपूर करण्यासाठी ते विविध मुद्दे हाताळत असल्याचा संशय ते स्वतःच निर्माण करत आहेत. ज्या पवारांना छत्रपतींचा पुतळा भंग झाला म्हणून राजकारण करावसं वाटतं, त्या पवारांनी छत्रपतींचे स्वप्न साकार करण्यासाठी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीत काय काय प्रयत्न केले आहेत? छत्रपतींनी अठरापगड जाती एकत्र आणल्या आणि स्वराज्य निर्माण केलं. राज ठाकरे म्हणतात, पवारांनी महाराष्ट्रात जातिवादाचं विष पेरलं. म्हणजेच पवारांनी छत्रपतींच्या इच्छेविरुद्ध काम करून जाती-जातीत भांडणे लावली, असा याचा अर्थ होतो का? विरोधक देवेंद्र फडणवीसांना त्यांच्या जातीवरून हिणवतात. कोल्हापूरच्या संभाजीराजे यांना राज्यसभेची खासदारकी दिली तेव्हा पेशवे आता छत्रपतींची नेमणूक करू लागले, अशा प्रकारचं विधान शरद पवारांनी केलं होतं. यातून त्यांना काय संदेश द्यायचा आहे? मराठा आणि ब्राह्मण समाजात त्यांना फूट का पाडायची आहे? महाराष्ट्राचा मणिपूर होईल, अशी वक्तव्ये ते का करतात? त्यापेक्षा महाराष्ट्राचा आनंदवनभुवन होईल, असे प्रयत्न ते का करत नाहीत? त्यांचा अनुभव ते महाराष्ट्राच्या विकासासाठी का खर्च करत नाहीत? २०१४ पासून फडणवीसांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी ते इतके का झटत आहेत?

लक्षात घ्या, शरद पवारांनी अनेक वर्षांपासून राष्ट्रवादीऐवजी इतर पक्षाचाच मुख्यमंत्री बसवून त्यांनी राज्याची सूत्रे हलवली आहेत. २०१४ साली जेव्हा भाजपाचं बहुमत हुकलं तेव्हा पवारांनी बाहेरून पाठिंबा दिला होता. तोपर्यंत त्यांना फडणवीसांचा स्वभाव आणि कार्य करण्याची पद्धत माहीत नव्हती. पण जेव्हा पवारांना कळलं की, फडणवीस हे स्वयंभू आणि स्वतंत्र वृत्तीचे अभ्यासू नेते आहेत. त्यांना नाचवता येणार नाही. त्यांना मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर बसू दिलं तर आपल्याला सूत्रे हलवता येणार नाहीत. तेव्हापासून पवार आणि फडणवीस संघर्ष सुरू झाला. पवारांना कोणतंही सरकार स्थापन झालेलं चालणार आहे. पण मुख्यमंत्री त्यांच्या मर्जीतला हवा. फडणवीस त्यांना नकोत. कारण महाराष्ट्रात फडणवीस पवारांना मात देतात, त्यांचं ऐकत नाहीत. म्हणूनच कोणतंही आंदोलन असेल, मोर्चा असेल तेव्हा दोष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना न देता एकट्या फडणवीसांना लक्ष्य केलं जातं. यामागचा अर्थ सामान्य जनतेला कळत नाही, असं आघाडीतल्या नेत्यांना वाटतं. पण जनता हुशार आहे. फडणवीसांनी जनतेला न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न केलेला आहे. बदलापूर प्रकरणातही त्यांनी आरोपीला पाठीशी न घालता कठोर शिक्षा होईल याची काळजी घेतली, पुणे पोर्शे अपघातातदेखील उच्चभ्रू गुन्हेगारांना शिक्षा होईल, अशी कारवाई केली. अशी चांगली कामं करणारा नेता महाराष्ट्रात नको, यासाठी मोठा डाव आखला जात आहे. पण काही केल्या फडणवीसांना मात देता येत नाही. ते मुख्यमंत्री नसले तरी आजही सत्तेत सहभागी आहेत आणि हीच विरोधकांची खरी पोटदुखी आहे. म्हणूनच पवार पावसात भिजून अचानक महिलांच्या संरक्षणाची शपथ घेतात तेव्हा मनात धडकी भरते. फडणवीसांना पाडण्यासाठी पुढे काय काय होणार आहे, याचा विचार करून मन सुन्न होतं. ही विधानसभेची निवडणूक एक महत्त्वाची परीक्षा असणार आहे. महाराष्ट्रात पवार जिंकतात की फडणवीस यावरून महाराष्ट्राच्या पुढील राजकारणाला गती मिळणार आहे. पवार हे प्रचंड अनुभवी, ज्येष्ठ नेते आहेत, तेल लावलेला पैलवान आहे. पण फडणवीस यांची बाजू सत्याची आहे. फडणवीस हे छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन कार्य करीत आहेत. ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**महेंद्र आकांत**

# आंदोलनं...

सध्या महाराष्ट्र राज्यात आंदोलन... आंदोलन... नावाचा खेळ सुरू आहे. काहीही खुट वाजलं... काहीही अनुचित घटना घडली तरी विरोधक आंदोलनाचा बडगा उगारत आहेत. एका प्रकरणाची आग पेटविली जाते, त्याचा धूर चारही दिशांना पसरविण्याचा प्रयत्न केला जातो न् जातो तोच दुसरी एखादी नैसर्गिक आपत्ती का होईना घटना घडते आणि पहिली आग शांत होऊन दुसरा आगडोंब उठविला जातो. साधारणत: निवडणुका आल्या रे आल्या की सत्तापक्षाला अडचणीत पकडण्यासाठी विरोधकांकडून आंदोलन, नारे निदर्शने, बंद आदी अनेक हत्यारे उपसली जातात. बदलापूरमध्ये एक घटना घडली. निश्चितच या घटनेचा निषेध व्हावा तितका थोडाच आहे. अशा घटनांमधील अपराध्यांना कठोरात कठोर शिक्षा दिली पाहिजे, ही तर सर्वसामान्य लोकांचीही मागणी राहू शकते. ज्यांना मुली आहे ते तर अशा नराधमांना ठेचून काढा, अशीही मागणी करू शकतात. मात्र, अशा घटनांचे राजकीय भांडवल न करता सामोपचाराने, सर्वसंमतीने त्यावर उपाययोजना केल्या पाहिजे. हे न करता विरोधक आंदोलनाचा आगडोंब उसळवितात. या बदलापूर घटनेच्या निमित्ताने महाराष्ट्र बंदचे आवाहन करून विरोधातील महाविकास आघाडीने विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर सरकारविरोधी वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे मोठ्या प्रमाणावर महिला वर्ग सत्तापक्षाकडे वळण्याचा अंदाज घेऊन त्यांच्या विरोधात वातावरण निर्माण करण्याचा विरोधकांचा डाव होता. लहान मुलीच सुरक्षित नाही तिथे लाडकी बहीण काय घेऊन बसलात, असे नॅरेटिव्हही तयार झाले होते. मात्र, न्यायालयाने हा बंद अवैध ठरवून त्यांचा डावच उधळून लावला. तेव्हापासून विरोधक चांगलेच



चवताळले आहेत. आता त्यांच्या हाती सिंधुदुर्ग किल्ल्याच्या पुतळ्याचे प्रकरण लागले आहे. तो पुतळा उभारण्याचे काम नौदलाने केले. मात्र, त्याचे खापर महाराष्ट्र शासनावर फोडले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्या पुतळ्याचे लोकार्पण झाल्यामुळे या घटनेची नैतिक जबाबदारी मोदी यांनी घ्यावी आणि देशवासीयांची माफी मागावी, अशी मागणी केली जात आहे. जम्मू-काश्मीर आणि हरयाणा विधानसभेच्या निवडणुकांचा कार्यक्रम झाला असला, तरी इकडे महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटून विरोधक आंदोलनाचे हत्यार उपसून कामाला लागले आहेत. त्या तारखा जाहीर झाल्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांना अजूनही आंदोलनापासून फुरसत मिळालेली नाही. कोणत्या ना कोणत्या कारणाने हे आंदोलन हाती घेतले जात आहे. अजून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झालेल्या नाहीत. एकूणच परिस्थिती पाहता राज्यातील महायुती सरकारनेही सावध व गरज पडल्यास आक्रमक भूमिका घेणे गरजेचे आहे.

लोकसभा निवडणुकीच्या आधीही विरोधकांकडून देशभर असेच आंदोलन पुकारण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने शेतकरी आंदोलन, शाहीनबाग आंदोलनाचा उल्लेख करता येईल. शेतकऱ्यांच्या हिताचे कायदे असतानाही त्याला विरोध केला गेला. एवढेच नव्हे, तर ठिय्या आंदोलन करून सर्वसामान्यांचे हाल बेहाल करून टाकले होते. शाहीनबाग आंदोलनामुळे तर देशात जातीयवादाचा मोठा आगडोंब उसळण्याची शक्यता निर्माण झाली होती. शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने लाल किल्ल्यापर्यंत आंदोलनकर्त्यांनी मजल मारली होती. साधारणत: माझा असा अनुभव आहे की, देशात, राज्यात जेव्हा निवडणुका अपेक्षित असतात तेव्हा विरोधकांकडून आंदोलनाचे शस्त्र पाजळले जात असते. त्यात सर्वसामान्यांच्या संपत्तीची मोठ्या प्रमाणावर हानी होत असते, कधी कधी तर अशी आंदोलने जीवावरही बेतत असतात. मात्र, त्यांचे कोणाला काही सोयरसुतक नसते. निव्वळ आपली पोळी भाजून घेणे, हाच त्या मागचा हेतू असतो. लोकांमध्ये सत्तापक्षाविरुद्ध जहर पसरविणे हाच त्या मागचा प्रमुख उद्देश असतो, सत्तापक्षाला सत्तेवरून हुसकावून लावून सत्ता बळकावणे, अशी विरोधकांची अपेक्षा असते. येनकेनप्रकारेण सत्ता बळकाविणे, हे विरोधकांचे उद्दिष्ट असते. यांना सर्वसामान्यांच्या प्रश्नांशी, त्यांच्या समस्या; अडचणींशी काहीही देणे घेणे नसते. बरं, हे पुन्हा सत्तेत आले तर जनसामान्यांसाठी काही करतात का? तर उत्तर आहे नाही... मात्र, आंदोलनाचा दाह शांत झालेला असतो. एवढेच... ▮

९८८१७१७८०३

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# उबाठाकडून निव्वळ ढोंगबाजी

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी देशातील सर्वच संवैधानिक यंत्रणांचा वारंवार अपमान केला आहे. देशाच्या पंतप्रधानांचा अवमान केला आणि सातत्यानं करतच असतात. आता तर यांची मजल देशाच्या सर्वोच्च पदावरही चिखल उडविण्याइतपत पोहोचल्याचे दिसले. निमित्त झाले आपल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नुकत्याच महिला सुरक्षेविषयी व्यक्त केलेल्या भावनेचे. राष्ट्रपतींनी देशाच्या प्रमुख आणि एक महिला म्हणून देशातील तमाम महिलांच्या सुरक्षेविषयी चिंता व्यक्त केली. त्यासाठी त्यांनी काही घटनांचा दाखलादेखील दिला. राष्ट्रपतींनी व्यक्त केलेल्या भावनांमागची महत्त्वाची भूमिका ही महिला सुरक्षेविषयीची चिंता आहे. असे असताना, विरोधक अर्थात मविआचे नेते, प्रामुख्याने बोलघेवडे संजय राऊत यांनी देशातील सर्वोच्च संवैधानिक पदावर लांच्छन लावण्याचे काम केले. राष्ट्रपतींनी कधी बोलावे, कधी बोलू नये याबाबत मार्गदर्शन हे बोलघेवडे देशाच्या सर्वोच्च पदाला करत आहेत. 'या घटनेवरच का बोलल्या? त्या घटनेवर का नाही बोलल्या?' असे अनेक प्रश्न हे लोकं राष्ट्रपतींच्या भूमिकेवर उपस्थित करताना दिसत आहेत. पश्चिम बंगालची अत्याचारग्रस्त डॉक्टर आपली मुलगीच आहे. पण बदलापूरच्या चिमुकल्या मुली राष्ट्रपतींच्या कुणीच लागत नाही का, असा प्रश्न हे टिनपाट लोक करताना दिसत आहेत. त्याचवेळी संदेशखालीच्या घटनेचा उल्लेख का केला नाही, असा प्रश्न मात्र यांनी विचारला नाही. मुळात राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या लेखात पश्चिम बंगालच्या ताज्या घटनेसह बदलापूरच्या चिमुकल्यांचा, दिल्लीच्या घटनेचा दाखला दिला आहे. मात्र, प्रातिनिधिक स्वरूपात उदाहरणंदेखील केवळ भाजपाशासित राज्यांचीच द्यावी, असा आग्रह विरोधकांचा आहे. घटना कितीही संवेदनशील असो, पण मविआच्या नेत्यांना मृतांच्या टाळूवरचे लोणी खाल्ल्याशिवाय समाधान वाटत नाही. प्रत्येक घटनेचं राजकारण करणे, खोटा 'नॅरेटिव्ह' पसरवून आपली राजकीय पोळी शेकणे यापलीकडे यांची बुद्धीच चालत नाही, हे या देशासाठी, समाजासाठी, माणुसकीसाठी लांच्छनास्पद आहे.

'महिलांची सुरक्षा : आता अती झाले...' अशा आशयाचं शीर्षक असलेल्या लेखातून राष्ट्रपतींनी एक महिला म्हणून आपली संतप्त भावना व्यक्त केली. महिलांच्या सुरक्षेला घेऊन चिंताही व्यक्त केली. त्याचबरोबर त्यांनी उपाययोजना करण्याचे, महिलांना आत्मरक्षणाचे धडे देण्याचे आणि समाजातील विकृती दूर करण्याची गरज असल्याच्या सूचनाही दिल्या आहेत. त्यांनी केवळ पश्चिम बंगालमध्ये उपाययोजना करण्याची किंवा बदलाची गरज आहे, असे कुठेही म्हटलेले नसून देशातच अशा घटना घडत आहेत. त्यासाठी संपूर्ण देशात बदलाची, उपाययोजनांची गरज असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या लेखात म्हटलं आहे. पण विरोधकांना प्रत्येक गोष्टींचंच भांडवल करण्याची सवय जडली आहे. खोटा नॅरेटिव्ह पसरवून समाजात दुही निर्माण करणे, आपली राजकीय पोळी शेकणे यासारखे अत्यंत असंवेदनशील असे सुप्त हेतू यामागे आहेत. यांना महिलांच्या सन्मानाशी, रक्षणाशी काहीही देणंघेणं नाही. हे संजय राऊत यांच्या कंगना राणावत, माजी खासदार नवनीत राणा, डॉ. स्वप्ना पाटकर यांच्याविषयी वापरलेली भाषा, डॉ. स्वप्ना पाटकरांसोबतचा संजय राऊतांचा टेलिफोनिक संवाद ऐकला तर याला नेता किंवा एखाद्या वृत्तपत्राचा कार्यकारी संपादक हे पद शोभत नाही. गल्लीबोळातील हा एक विकृत, चिरकूट असा थिल्लर टपोरी असा माणूस असल्याचे सिद्ध होते आणि हीच व्यक्ती इतरांना शहाणपण शिकवते, महिलांच्या सन्मानाविषयी बोलते. इतकंच काय, देशाच्या राष्ट्रपतींनासुद्धा आता सल्ले देताना दिसतो तेव्हा हसू आवरत नाही. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना राज्यात महिलांवर अत्याचार झाले नाहीत? राज्यात बलात्काराच्या, महिलांच्या हत्येच्या घटना घडल्या नव्हत्या? घडल्या होत्या... नुसत्या घडल्याच नाही तर त्या वाढल्या होत्या. उद्धव ठाकरेंच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात संजय राऊतांविरोधात डॉ. स्वप्ना पाटकरांनी तक्रार दिली होती. त्यांच्याच कार्यकाळात संजय राऊतांनी फोनवरून डॉ. स्वप्नांना अश्लील शिवीगाळ केली होती. उद्धव ठाकरेंकडून काय कारवाई करण्यात आली होती संजय राऊतांविरोधात तेव्हा? त्यावेळी तरुण, तरुणी, म्हातारे, अभिनेत्री, पोलिस, उद्योगपती, व्यापारी, नेव्ही ऑफिसर, खासदार, आमदार, मंत्री, केंद्रीय मंत्री असे कोणीही सुरक्षित नव्हते, कुण्या एका महिलेला मदत केली म्हणून जितेंद्र आव्हाडाने 'जाऊ दे, मरू दे तिला. तू मध्ये पडू नको'चा सल्ला दिला होता, त्याचीही ध्वनिफीत समाजमाध्यमांवर फिरत आहे, मध्यप्रदेशात काँग्रेसने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा जमीनदोस्त केला होता आणि आता मात्र नकळत कुठल्या तरी नैसर्गिक आपत्ती किंवा तांत्रिक बाबींमुळे पुतळा कोसळला तर त्याचं भांडवल करताना हेच लोक दिसत आहेत. समाजाच्या भावना भडकावणे, जाती-जातीत, धर्मा-धर्मांमध्ये तेढ निर्माण करण्याचे प्रकार हे संधिसाधू लोक वारंवार करत आहेत.

उद्धव ठाकरेंनी स्वतः मुख्यमंत्री असताना महिला सुरक्षेविषयी, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसाठी काहीही एक केलं नाही. २०२० ते २०२३ या काळात राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजले होते. महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणांत वाढ झाली होती. स्वतःचं पाप आणि अपयश ठेवायचं झाकून आणि दुसऱ्याचं पाहायचं वाकून असा प्रकार या मविआच्या संधिसाधू, विकृत, समाजविघातक नेत्यांचा आहे. मणिपूरवर छाती बडवणारे हे लोकं संदेशखालीवर बोलताना दिसले नाही. 'आम्ही दोघं छोटेसे बहीण-भाऊ, उद्याला मोठाले होऊ...'वाले राहुल-प्रियांका या बहीण-भावाच्या जोडीने हाथरसला जाऊन प्रचंड ड्रामा केला. 'लडकी हूं लड सकती हूं'चा नारा दिला. मात्र, त्याचवेळी संदेशखाली, कोलकाता रेप ॲण्ड मर्डर केस झाल्यावर तेथे जाणे तर सोडा; त्यावर ब्रदेखील उच्चारला नाही. लाडकी बहीण योजना लागू केली तर ती रद्द करा म्हणून काँग्रेस एकदा नव्हे तर दोन-दोन वेळा उच्च न्यायालयात गेली आणि हेच लोक महिला सन्मान, महिला सुरक्षेचा कांगावा करत डांगोरा पिटत फिरत आहेत. नव्या संसदेच्या उद्घाटनाला बोलावले नाही तेव्हा हेच लोकं राष्ट्रपतींची प्रतिष्ठा, आदिवासी समाजाच्या सन्मानाचे गोडवे गात होते, पोवाडे म्हणत होते. याच लोकांना आदिवासी समाजाविषयी आत्मीयता आहे, ना संविधानाचा, ना संवैधानिक पदांचा, ना संवैधानिक यंत्रणांचा किंवा महिलांचा आदर, सन्मान आहे. त्यामुळे हे लोकं राष्ट्रपतींसारख्या सर्वोच्च संवैधानिक पदाचा आणि एक आदिवासी महिला म्हणून त्यांचा सन्मान करतील, ही अपेक्षाच करणं चुकीची आहे. ▮

९२७०३३३८८६

### राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे पेन्शन

नुकतेच राज्य सरकारने कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे पेन्शन मिळणार हा आनंद देणारा निर्णय कॅबिनेट बैठकीत घेतला त्यामुळे सरकारचे अभिनंदन आणि आभार. सध्या सरकार सर्व लोकांना खुश करण्याच्या योजना आखण्यात व्यस्त आहेत. पण राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, राज्य परिवहन महामंडळ, म्हाडा यासारख्या अनेक सरकारी निमसरकारी कार्यालयात, ३५ ते ४० वर्षे सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना की जे कर्मचारी जनतेच्या प्रत्यक्ष संपर्कात असतात आणि जनतेची सेवा करतात अशा कर्मचाऱ्यांसाठी सरकारजवळ कुठलीही योजना नाही कारण ते कर्मचारी ईपीएस-९५ योजनेअंतर्गत येतात. गेल्या १० वर्षांपासून केंद्रात व राज्यात डबल इंजिन सरकार आहे, पण या कर्मचाऱ्यांसाठी कोणीच काही करताना दिसत नाही. या कर्मचाऱ्यांना १५०० ते ३००० इतक्याच रकमेच्या पेन्शनवर गुजराण करावी लागते. केरळमधील कोर्टाने ईपीएफओच्या विरोधात व निवृत्त कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल दिला होता, त्याचाच संदर्भ घेऊन विद्युत मंडळातील लोकांना ईपीएफओने ऑप्शन फॉर्म मागितले होते तसे परिपत्रकही आले होते. त्या परिपत्रकात असे होते की कंपनीचा मिळालेला वाटा परत करावा लागेल व त्या आधारे पेन्शनचे कॅल्क्युलेशन केले जाईल या करिताच २०१४ च्या नंतर जे सेवानिवृत्त झाले त्यांनी ऑप्शन फॉर्म भरून द्यावा व त्यानंतर आपणास डिमांड येईल. पण तसा फॉर्म भरूनही २ वर्षाचा कालावधी लोटला तरी सुद्धा अजून कोणालाही डिमांड आली नाही. सर्व कामगार संघटना या प्रश्नावर आवाज उठवतात परंतु केंद्र सरकार व राज्य सरकार लक्ष द्यायला तयार नाहीत. काहीतरी निवडणुकीच्या दृष्टीने प्रलोभनकारी योजना काढून हजारो कोटी रुपये खर्च करतात. परंतु कर्मचाऱ्यांचेच हजारो कोटी रुपये भविष्य निर्वाह निधीत पडून आहे. त्यातूनच एखादी पेन्शन योजना करता आली तर करावी असा विचार देखील सरकारच्या मनात येत नाही. अशा निवृत लोकांनी कसे जीवन जगावे हा खूप मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. करिता केंद्र आणि राज्य सरकारला विनंती आहे की लवकरात लवकर ईपीएस-९५ च्या पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावावा व पेन्शनमध्ये वाढ करावी.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

## वाचक पत्रे

### आणिबाणीतील एक भयानक बाब

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९७५ साली देशावर लादलेल्या आणिबाणीच्या काळ्या काळात झालेल्या अत्याचारांबद्दल अनेक गोष्टी प्रकाशित झाल्या, परंतु एका भयानक बाबीकडे दुर्लक्ष होत आहे. तेव्हा मिसा कायद्याची सुनावणी सुप्रीम कोर्टात चालू असतानाच अॅटर्नी जनरल नीरेन डे यांनी स्पष्टपणे म्हटले होते की, पागल न्यायाधीशही मिसा अंतर्गत अटकेचा आदेश काढू शकतो तसेच मिसाबंदीच्या खुनासही कोणी जबाबदार राहणार नाही. हे वक्तव्य 'तरुण भारत'सह अनेक वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते. रा. स्व. संघाचे एक अधिकारी पांडुरंगपंत क्षीरसागर व अनेक मिसाग्रस्त निर्दोष नागरिक जेलमध्ये मृत्यू पावले. राजन नावाच्या एक मिसाबंदीचा भयानक छळ होऊन मृत्यू झाला. आणिबाणीनंतर जनता शासनातील गृहमंत्री चरणसिंग यांनी म्हटले होते की, जर १९७७ च्या निवडणुकीत काँग्रेसचा जय झाला असता तर जेलमध्ये अनेकांचे खून झाले असते. अॅटर्नी जनरल नीरेन डे यांच्यावर निवृत्त सरन्यायाधीश हिदायतुल्ला यांनी कठोर शब्दात टीका केली होती.

**डॉ. आनंद फडके**/९४२२१०८३८२

●● ●●

### विरोधकांचे नीतिशून्य राजकारण

आंदोलन कशासाठी? सत्तेसाठी! आंदोलनासाठी संधीच्या शोधात असणाऱ्या विरोधकांवर कृपावंत होऊन, छत्रपतींच्या पुतळ्याने विरोकांवर जणू अनन्य उपकार केले आहेत. आंदोलकांचा अभिनिवेश बघितल्यावर छत्रपतींचा पुतळा पडला या दु:खापेक्षा, आंदोलनाची संधी मिळाली, याचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत आहे. महाराजांनी अठरापगड जातींना, गुणी लोकांना मायेनं जोडून ताकद एकवटली आणि महाराष्ट्र घडविला. पडला तो शिवाजी महाराजांचा पुतळा आहे हे जाणून, छत्रपतींचे पाईक म्हणवून घेणाऱ्यांनी आधी एकवटून पुतळा उभा करण्यासाठी पावले उचलणे आवश्यक होते, पण ते घडले नाही. तसे घडले असते तर सकारात्मक राजकारणाचा संदेश जनतेत गेला असता. पण ते हवंय कोणाला?

**वसंत दीक्षित**/९१३७८६६६१७

●● ●●

### 'दुर्गा' एक सर्वांगसुंदर मालिका

आजच्या बहुतेक भिक्कार, टुकार, बेकार (अजून काय विशेषणं लावता येतील ती लावा!) मराठी मालिकांमध्ये कथा, अभिनय, संवाद, फोटोग्राफी या सर्व क्षेत्रात सरस व उत्कंठा वाढवणारी कलर्स मराठीवरची रात्री ७.३० वाजता येणारी मालिका 'दुर्गा' नक्कीच पाहावी अशी आहे. जरा नवीनच असणाऱ्या कलाकारांनी समरसून भूमिका केल्या आहेत. खरी पत्रकारिता करणारी सुंदर, तरुण व बेधडक दुर्गा, तिचा पत्रकार मित्र, खास राजकारणी दादासाहेब मोहिते व परिवार, त्यांचा कलंदर कलाकार मुलगा कवी गंधार, शिक्षण क्षेत्र, भ्रष्टाचाराला विरोध करताना जीव गमवावा लागणारा दुर्गाचा बाप यशवंत देशमुख, त्याची वेड लागलेली बायको व इतर समर्पक पात्रे. वाऽ बढिया सीरियल आहे दुर्गा! ▮

**रवी वाघमारे**/९९७००१८०३०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्रावण मासानिमित्त श्री मुदगुलेश्वर मंदिरात फुलांची आरास

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ ऑगस्ट -**

तिर्थक्षेत्र तुळजापूरच्या घाटशिळ पायथ्याशी असणाऱ्या श्रीमुदगुलेश्वर महादेव मंदीरात श्रावण मास निमित्ताने मंदीर परिसरात आकर्षक अशा फुलांचा आकर्षक असा आरास करुन मंदीरात आकर्षक देखावा साकारला होता.

श्री मुद्गलेश्वर सेवा समिती तथा श्री मुद्गलेश्वर युवा प्रतिष्ठानतर्फे श्री मुद्गलेश्वरांची महापुजा करण्यात आल्यानंतर अन्नदान आयोजन केला होता. याचा पंधरा हजार अन्नदान महाप्रसादाचा लाभ घेतला.

याचे आयोजन श्री मुद्गलेश्वर सेवा समिती तथा श्री मुद्गलेश्वर युवा प्रतिष्ठान यांनी केले होते.





## संक्षिप्त वृत्त...



### कदेर तंटामुक्त अध्यक्षपदी महादेव साखरे, उपाध्यक्षपदी वैशाली जाधव

**कदेर, दि.३१ ऑगस्ट -**

उमरगा तालुक्यातील कदेर गावात ग्रामपंचायत कार्यालयामध्ये वार्षिक ग्राम सभा पार पडली. यामध्ये गावातील विविध विषयावर चर्चा करण्यात आल्या. गावातील रस्ते, गावातील शिवाजी महाराज चौकातील समस्या, लिंगायत दफनभूमी, दारूबंदी, गावातील अतिक्रमण, महिलांचा विविध सुविधा आदी विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी तंटामुक्त अध्यक्षपदी महादेव साखरे तर उपाध्यक्षपदी वैशाली जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. याप्रसंगी सरपंच सतीश जाधव, उपसरपंच राणी राठोड, ग्रामविकास अधिकारी राजपूत व्ही.जी, जाधव मीनाक्षी, प्रवीण जाधव, शाम चौधरी, विवेकानंद चौधरी, पी.डी. जाधव, सुनील पाटील, तलाठी सुमैय्या बागवान, गावातील नागरिक व महिला उपस्थित होते.



### मंगरूळ जिल्हा परिषद प्रशालेत सखी सावित्री व सुरक्षा समिती गठीत

**मंगरूळ, दि.३१ ऑगस्ट -**


बदलापूर येथे घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी राज्य सरकारच्या वतीने खबरदारी घेऊन जिल्हा परिषद शाळेत व महाविद्यालयात सखी सावित्री व विद्यार्थी सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली. त्याच अनुषंगाने शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ यांची संयुक्त बैठक घेऊन ३१ ऑगस्ट रोजी सखी सावित्री व विद्यार्थी सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली. या समितीत पोलीस पाटील, सरपंच, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, प्रतिष्ठित नागरिक व विद्यार्थी प्रतिनिधी यांची निवड करण्यात आली. यावेळी सरपंच विजयालक्ष्मी डोंगरे, लक्ष्मण माळी, आप्पासाहेब जेटीथोर, मनोज डोंगरे यांच्यासह पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक राठोड यांनी केले तर सूत्रसंचालन वाघचौरे यांनी केले.



### सेवानिवृत्तीनिमित्त मुख्याध्यापक अशोक रोडगे यांचा सत्कार

**लोहारा, दि.३१ ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील होळी येथील जि.प.प्रा. शाळेतील मुख्याध्यापक अशोक रोडगे सेवानिवृत्त झाल्याने दि.३१ ऑगस्ट रोजी होळी येथे ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उषा चव्हाण होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन सरपंच सरोजा बिराजदार, विनोद गायकवाड, शिक्षक सूर्यवंशी, माळी, वाघमारे, माने, स्वामी, मठपती आदी उपस्थित होते. कार्यक्रमास ग्रामस्थ उपस्थित होते.



### महाराष्ट्र राज्य तलाठी महासंघाचे एक दिवशीय कामबंद आंदोलन

**लोहारा, दि.३१ ऑगस्ट -**

आडगाव रेजे (ता. वसमत, जि. हिंगोली) येथील तलाठी संतोष पवार यांची तलाठी कार्यालयात निर्घृण हत्या केल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य तलाठी महासंघ लोहारा तालुका यांच्यावतीने दि.२९ ऑगस्ट रोजी एक दिवशीय लाक्षणिक काम बंद करुन आंदोलन करुन तहसीलदार काशिनाथ पाटील यांना निवेदन दिले. या घटनेचा निषेध करुन आंदोलनाला पाठींबा देऊन तहसीलच्या कर्मचाऱ्यांनी काळ्या फितु लावुन दिवसभर कामकाज केले. या निवेदनावर अध्यक्ष डी.एम. रेड्डी, उपाध्यक्ष एम.झेड. सय्यद, सचिव के.एन. पवार, कोषाध्यक्ष एस.जी. माळी, मंडळ अधिकारी वाजीद मनियार, मंडळ अधिकारी बी.एस. बरनाळे, अदिंच्या सह्या आहेत.

### घोळसगाव तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी संजय होळे

**जळकोट, दि.३१ ऑगस्ट -**

येथून जवळच असलेल्या घोळसगाव (ता. अक्कलकोट) येथील महात्मा गांधी गाव तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी संजय होळे यांची एकमताने निवड करण्यात आली. घोळसगाव ग्रामपंचायत ग्रामसभेत तंटामुक्त समिती अध्यक्ष निवडीसाठी चर्चा करण्यात आली. त्यानंतर संजय होळे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीनंतर ग्रामपंचायत कार्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला. या निवडीचे गावात स्वागत करण्यात आले आहे.

दादा... शेती, घरे जातय; आम्ही जगायाचे कसे! तुम्हीच सांगा?... महिलांनी मांडल्या दादांसमोर आपल्या व्यथा...

# मी सदैव तुमच्या पाठीशी; अन्याय होवु देणार नाही : आ. राणादादा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ ऑगस्ट -**

साहेब आमची रोटी जावुन आज आम्ही उघड्यावर येणार असल्यामुळे आम्हाच्यासाठी काही तरी करा असा टोहो तडवळा येथे रेल्वे बाधीत महिला, पुरुष, गोरगरीब वर्गातील मंडळींनी व शेतकरी वर्गाने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या समोर मांडला. यावेळी त्यांनी बाधीतशेत मंडळींसमोर बोलताना पाटील म्हणाले कि, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत, हे लक्षात ठेवा. तुम्हा बाधीतांना घरे मावेजा बाबतीत मी न्याय मिळवुन देईल, अशी ग्वाही यावेळी दिली.

बुधवार दि.२८ रोजी रात्री तडवळा येथील बाधीत शेतकऱ्यांच्या विनंतीवरुन आमदार राणाजगजितसिंह पाटील हे दाखल होताच यावेळी रस्त्यावरच गावच्या जेष्ट महिलांनी साहेब आम्ही उघड्यावर पडत असल्याने तुम्ही आम्हाला उघड्यावर पडू देवू नका, अशी मागणी केली. यावेळी एका विधवा महिला व्यथा मांडताना म्हणाली कि, साहेब मला तीन मुले आहेत.

माझे घर रेल्वे स्टेशनसाठी घेतलेल्या जागेत जाणार आहे. तर मला अवघे ७५० रुपये नुकसान भरपाई आली आहे, अशी व्यस्था मांडली. या भागात शंभरच्या आसपास घरे उठणार आहेत. त्यामुळे आम्ही आता कुठे जावे असा सवाल केला. यावेळी अनेक शेतकऱ्यांनी साहेब येथे एकरी साठ ते सत्तर लाख रुपये भाव असताना अत्यल्प मावेजा दिला आहे. द्राक्ष शेती बागायत असताना हंगामी बागायत दाखवली आहे. अवार्डमध्ये अनेक चुका आहे. स्वतंत्र सातबारे असताना ज्वाँईट खात्यावर सामाईक खाते दाखवले आहेत. आमची रोजीरोटी जावुन आम्ही उघड्यावर येणार आहोत. त्यामुळे आमच्यासाठी काहीतर करा कारण प्रशासन चुकीच्या माहीती आधारे बाधीतांना अत्यल्प मावेजा देत आहे, असा आरोप यावेळी केला. यावेळी बाधीत ग्रामस्थ झोपडपट्टी धारक व शेतकऱ्यांनी दादांसमोर आपली गाऱ्हाणे मांडले. सर्वाचे एकुण घेतल्यानंतर या बाबतीत मी तुमच्या पाठीशी असेन व तुमच्यावर अन्याय होवू देणार आपल्या देशाचे पंतप्रधान हे शेतकरी गोरगरीबांवर अन्याय होवु नये याची काळजी घेतात, असे यावेळी स्पष्ट केले.



यावेळी विनोद गंगणे, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, नानासाहेब लोंढे, सरपंच कांबळे, उपसरपंच राजाभाऊ चंदनशिवे, दिंगबर सरक, लखन गुंड, मधुकर गुंड सह शेकडो ग्रामस्थ, शेतकरी उपस्थितीत होते.




**तेर :** धाराशिव तालुक्यातील तेर जवळील तेरणा धरणातील पाण्याचे जलपूजन आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाखा अभियंता धनंजय वरपे, निहाल काझी, उपसरपंच श्रीमंत फंड, नवनाथ नाईकवाडी, प्रविण साळुंके, रामा कोळी, जुनेद मोमीन, अजित कदम, नवनाथ पसारे, प्रतिक नाईकवाडी, इर्शाद मुलांनी व नागरिक उपस्थित होते.

## कळंब शहर 'डीजे' मुक्त करा; ज्येष्ठ नागरिकांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३१ ऑगस्ट -**

कळंब शहरातील ज्येष्ठ नागरिक व शहरवासीयांच्या वतीने कळंब शहर डीजे मुक्त करण्याची मागणी उपविभागीय अधिकारी व उपविभागीय पोलिस अधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, कळंब शहरामध्ये ज्येष्ठ नागरिक यांना अनेक आजार आहेत. यामध्ये शुगर पेशंट, हृदय पेशंट, महिला व बालके यांना विविध आजार आहेत. शहरात होणाऱ्या अनेक कार्यक्रमात डी. जे. वाजवण्यात येत आहेत. त्यामुळे ध्वनिप्रदूषण होऊन आनेक नागरिकांना याचा त्रास होत आहे. त्यामुळे येणारे सर्व सण, उत्सव, नेत्यांचे वाढदिवस, लग्न जयंती यामध्ये सर्रास डीजेचा वापर होत आहे. त्यासाठी विविध संघटनेचे पदाधिकारी, पक्षाचे प्रमुख, कार्यकर्ते यांनी पारंपारिक वाद्य वाजवावीत व धार्मिक सोहळ्याचा आनंद सर्वांना मिळावा या बाबतीत आपल्या स्तरावर प्रमुख पदाधिकाऱ्यांना कळवुण राजकीय धार्मिक प्रमुखांना मार्गदर्शनपर सूचना कराव्यात व कायद्याचे पालन करण्याबाबत सूचना द्याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.



निवेदनावर प्रकाश भडंगे, हर्षद अंबुरे, किशोर वाघमारे, भास्कर सोनवणे, विलास मिटकरी, सतपाल बनसोडे, राहुल हौसलमल, सुनील ताटे, महावीर गायकवाड, प्रशांत रत्नाकर, हनुमंत पाटुळे, सुदर्शन शिंदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## श्री छत्रपती शिवाजी विद्यालय तलमोड येथे विद्यार्थ्यांनी साकारली परसबाग

**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.३१ ऑगस्ट -**

भारत शिक्षण संस्था उमरगा, संचलित श्री छत्रपती शिवाजी विद्यालय तलमोड प्रशालेत इको फ्रेंडली क्लब आणि हरित सेनेच्या वतीने शाळेच्या २ गुंठे जमिनीवर वांगी, पालक, मेथी, चुका, मिरची, भेंडी, अशा विविध पालेभाज्या आणि फळ भाज्यांची लागवड करुन या परसबागेतील पालेभाज्या आणि फळभाज्यांचा इयत्ता ८ वी वर्गातील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात याचे भाजीपाल्यांचा वापर करण्यात येणार आहे.

त्यामुळे सर्वच भाजीपाला सहजतेने उपलब्ध होणार असून विद्यार्थ्यांना सकस आणि पोषण आहार या माध्यमातून मिळणार आहे.

यावेळी राष्ट्रीय हरित सेनेचे सर्व विद्यार्थी, आणि इको क्लबच्या सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून सर्वांनी स्वकष्टाने ही परसबाग तयार केली आहे. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक मोरे जयवंत, राष्ट्रीय हरित सेनेचे करबस माळी, महेश सूर्यवंशी, जितेंद्र जाधव, नितीन राठोड, अश्विनी बिराजदार, नंदा वडदरे, अरविंद पाटील, प्रकाश मोरे यांचे सहकार्य लाभले.

ही सर्व रोपे कर्नाटक सिमावर्ती भागातून आणण्यात आले. सर्व प्रकारचे डोस आणि खत व फवारणी करण्यात आली. यासाठी विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.



## भूम येथे कलावंत मेळाव्यास साहित्यिकांचा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.३१ ऑगस्ट -**

येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहामध्ये दि.३० रोजी मराठवाडा लोककला विकास मंडळ व वृद्ध साहित्यिक कलाकार संघटनेच्यावतीने लोक कलावंत मेळावा व संस्कृत कला महोत्सव लोककला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत तालुक्यातील मोठ्या प्रमाणात कलावंतांनी उपस्थिती लावली होती.

स्पर्धेच्या उद्घाटनासाठी उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील, पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी, वारकरी साहित्य परिषदेच्या भूम तालुकाध्यक्ष मंदाबोराडे, वृद्ध कलाकार मानधन निवड समिती सदस्य शंकरराव खामकर, शशिकला गुंजाळ, लावणी कलाकार स्नेहा दुधाळ, गायत्री तिवारी यांचेसह अनेकांची उपस्थिती होती. या स्पर्धेतील भारुड, पोतराज, आराधी, भजनी मंडळाच्या गायकांनी चांगलाच सूर धरला होता. स्पर्धेतील उत्कृष्ठ प्रथम भजनी मंडळास ५ हजार, द्वितीय ३ हजार, तृतीय २ हजार रुपये व उत्कृष्ट आराधी मंडळसाठीही अशाच प्रकारची बक्षीसे देण्यात आली.

समारोप प्रसंगी स्वतंत्ररित्या बक्षिसांचे वाटप करण्यात आले. मराठवाडा लोककला विकास मंडळ व वृद्ध साहित्यिक कलाकार संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या लोककलावंत मेळावा, सांस्कृतिक कला महोत्सव स्पर्धेमध्ये आराधी प्रकारात आरसोली व अनिता काळे आराधी मंडळांनी तर भजन प्रकारात वीर गल्ली विठ्ठल रुक्मिणी व सोनगिरी मंडळाने विभागून प्रथम क्रमांक मिळवला,. त्यांना कार्यक्रमस्थळी बक्षीस घेऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमासाठी वृद्ध, ज्येष्ठ साहित्यिक कलाकार संघटनेचे पदाधिकारी व सर्जेराव इंदलकर, महादेव राजाराम जाधव, गुंजाळ महाराज यांनी परिश्रम घेतले.

## विलासपुर पांढरीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.३१ ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील विलासपूर पांढरी या गावातील शालेय विद्यार्थ्यांसाठी श्रीमती कोंडाबाई पाटील व कै. गणपतराव पाटील यांच्या स्मरणार्थ वर्षभरात शालेय विद्यार्थ्यांनी केलेल्या उज्ज्वल कामगिरी बद्दल पारितोषिक आणि चषक देवून गौरविण्यात आले.

या पारितोषिक वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मारूती कार्ले तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य आर.टी. राठोड, अँड. मुरगे, प्रा. व्यंकटराव चिकटे, उपसरपंच अशोक जांभळे, पर्यवेक्षक एम.वाय. भोसले, डॉ. आदिती लोंखडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास पोलीस पाटील सूर्यकांत पाटील, गजानन जायफळे, उन्मेष पाटील, किसन खोत, सिद्धेश्वर कार्ले, महादेव कार्ले, गहिनीनाथ बिराजदार, किसन जांभळे यांच्यासह गावातील नागरिक, शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

## श्री संत सेना महाराज पुण्यतिथी उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.३१ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथे श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

विठ्ठल रुक्माई मंदिरात दोन दिवस धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम घेत श्री संत सेना महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली. दि.३० रोजी गुलाल व महाप्रसादाने सांगता झाली. बारा वाजता महाआरती, गुलाल व पुष्पवृष्टीने गुलाल सोहळा झाली.

यावेळी कार्यक्रमास गणेश अपुणे, रामचंद्र दिघे, संजय सावंत, अमोल अपुणे, मयूर गोरे, ज्ञानेश्वर पंडित, आबा पंडित, विनय अपुणे, रामभाऊ पंडित, अंकुश अपुणे, तेजस सावंत व भजनी मंडळ तसेच नाभिक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न्यु होम मिनिस्टर कार्यक्रमास महिलांचा उदंड प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ ऑगस्ट -**

महाविकास आघाडीचे नेते अशोक जगदाळे यांच्यावतीने तेर येथे आयोजित केलेल्या खास महिलांसाठी प्रसिद्ध सिनेअभिनेते क्रांती नाना मळेगावकर व टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांचा न्यु होम मिनिस्टर या कार्यक्रमाला महिलांचा तुफान प्रतिसाद मिळाला. त्यामुळे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या होमग्राऊंडवर अशोक जगदाळे यांची दमदार इंट्री झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

सध्या महाविकास आघाडीचे नेते अशोक जगदाळे यांच्याकडुन विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरु आहे. यावेळेस कसल्याही परीस्थितीत तुळजापुर विधानसभा मतदार संघात विजय मिळवायचाच या उद्देशाने अशोक जगदाळे यांच्याकडुन विधानसभा निवडणुकीची मोर्चेबांधणी सुरु आहे. जुना तुळजापुर विधानसभा मतदार संघातील गावे पिंजुन काढल्यानंतर आता अशोक जगदाळे यांनी त्या ७२ गावांवर आपले लक्ष केंद्रीत केले आहे.

सध्या त्यांनी खास महिलांसाठी आयोजित केलेला प्रसिद्ध सिनेअभिनेते क्रांती नाना मळेगावकर व टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांचा न्यु होम मिनिस्टर हा कार्यक्रम या ७२ गावांमध्ये सुरु आहे. बेंबळी आणि तेर याठिकाणी हा न्यु होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे प्रयोग झाले आहेत. बेंबळी आणि तेर येथील दोन्ही कार्यक्रमांना महिलांचा तुफान प्रतिसाद मिळाला आहे. तेर येथील कार्यक्रमाला तर महिलांचा उदंड प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे अशोक जगदाळे यांचा विधानसभा निवडणुकीत विजयी होण्याचा कॉन्फिडन्स आणखी वाढला आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे तेर हे मुळ गाव आहे. त्यांच्याच गावात अशोक जगदाळे यांनी खास महिलांसाठी न्यु होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन करून दमदार इंट्री केली आहे. या कार्यक्रमाला तेर येथील महिलांचा तुफान प्रतिसाद मिळाला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जनतेचे प्रेम हाच राजकीय पुढाऱ्यांचा दागिना असतो- आ.गुट्टे

**गंगाखेड,/प्रतिनिधी:** कोणाला विजयी करायचे आणि कोणाला पराभूत करायचे, हे माय-बाप जनतेच्या हातात असते. त्यामुळे लोकशाहीत जनता सार्वभौम असते. एखाद्या माणसाला उंचीवर नेण्याची किमया जनताच करते आणि जमिनीवर आणण्याचे काम सुध्दा जनताच करते. म्हणून राजकीय क्षेत्रात जनतेचे प्रेम हाच राजकीय पुढाऱ्यांचा दागिना असतो, असे प्रतिपादन गंगाखेडचे रासप आमदार डॉ. रताकर गुट्टे यांनी केले.

आळंदी देवाची येथील रसिकलाल धारीवाल सभागृहात आयोजित कौटुंबिक स्नेह मेळाव्यास संबोधित करताना ते बोलत होते. या मेळाव्यास गंगाखेड विधानसभेतील पुणे व आळंदी येथे वास्तव्यास असलेल्या हजारो लोकांनी उत्स्फूर्तपणे गर्दी केली होती. तसेच महिलांची संख्या लक्षणीय होती. पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, गेल्या पाच वर्षांत गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करण्यासाठी हजारो कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच ४० वर्षापासून प्रलंबित असलेल्या अनेक प्रश्न सोडवले आहेत. रस्ते, पाणी आरोग्य, शिक्षण, वीज यासह अनेक पायाभूत सुविधांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. नागरिकांचे वैयक्तिक अडचणीही दूर केल्या आहेत. तरीही तुमचे काही प्रश्न व समस्या असतील, तर त्याही मार्गी लावण्याचा प्रमाणिक प्रयत करीन. तीन तालुक्याच्या आपल्या मतदारसंघात जवळपास २८४ गावे आहेत. त्या प्रत्योक गावात वेगवेगळ्या योजनेतून विकास निधी पोहोचला आहे, याचा आनंद वाटतो. तसेच तब्बल ४७५ किलोमीटर रस्त्यांचे काम पूर्ण होणारा गंगाखेड हा महाराष्ट्रातला एकमेव विधानसभा मतदारसंघ आहे, हे सांगताना मला विशेष अभिमान वाटतो. आपल्या मतदारसंघातील १७५ गावात स्मशानभूमी बांधकाम पूर्ण केले. प्रत्योक तांड्यावर सेवालाल महाराज सभामंडप, मातंग वस्तीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, बौद्ध वस्तीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह आणि धनगर वस्तीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी सांस्कृतिक सभागृह देवून आपल्या उपकारातून थोडाफार उत्तराई होण्याचा प्रामाणिक प्रयत केला असल्याचेही आ.डॉ.गुट्टे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, तत्पूर्वी, उपस्थित महिलांच्या वतीने प्रातिनिधिक माता-भगिनींना आ.डॉ. गुट्टे व आ.दिलीप मोहिते यांचे औक्षण करून राखी बांधली. परिणामी, कार्यक्रमाचे औचित्या साधून आ.डॉ.गुट्टे यांच्या शुभहस्ते उपस्थित महिलांना भावाची ओवाळणी म्हणून सुबक व आकर्षक साडी चोळी आणि पाच किलो साखरेचे वाटप करण्यात आले. अतिशय उत्साहात संपन्न झालेल्या या कौटुंबिक सोहळ्यात अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करून मतदारसंघातील विकास कामांचा आढावा उपस्थित जनतेसमोर मांडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी हनुमंत मुंढे, तर सूत्रसंचालन पदुदेव जोशी यांनी केले. आभार रामप्रसाद सातपुते यांनी मानले. यावेळी खेडचे आमदार दिलीप मोहिते, युवा उद्योजक धनराज गवळी, मंदिर ट्रस्टी अजित वडगावकर, माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, माजी नगरसेविका वर्षाताई शिंदे यांच्यासह मित्रमंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, मतदारसंघातील सर्व स्थानिक रहिवाशी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

तरीही मी समाधानी नाही! गंगाखेड विधानसभा मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची कामे झाली असली, तरी मी समाधानी नाही. कारण, मला माझे तीन तालुके महाराष्ट्रात नावारूपाला आणायचे आहेत. त्यासाठी मी अहोरात्र परिश्रम घेत आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी सांगितले.



म्हणून तुम्ही केवळ आमदार नव्हे, तर मंत्री सुध्दा व्हाल! २०१९ सालच्या निवडणुकीत तुमच्यावर आरोपांची सरबत्ती झाली. तरीही तुमचे कार्यकर्ते निधड्या छातीने लढले. गावोगावी पोहोचले आणि केवळ दहा दिवसात तुम्हाला आमदार केले. त्यामुळे असे जीवाभावाचे जिगरबाज कार्यकर्ते लाभायला सुध्दा भाग्य लागते. म्हणून तुम्ही नशीबवान आहात. त्यामुळे येत्या निवडणुकीत तुमच्या प्रामाणिक व एकनिष्ठ कार्यकर्त्यांच्या बळावर तुम्ही केवळ आमदार नव्हे, तर मंत्री सुध्दा व्हाल, असा विश्वास आमदार दिलीप मोहिते यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त वृत्त...

### त्या पथनाटयाव्दारे परभणीकरांचे लक्ष

**परभणी,/प्रतिनिधी:** कलकत्ता येथील वैद्यकीय महाविद्यालयातील महिला डॉक्टरवरील बलात्कारासह क्रुरहत्येचा व बदलापूरातील विद्यार्थीनीवरील अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ दयावन सरकार संघटनेने गुरुवारी (दि.२२) जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठा मोर्चा काढून निषेध नोंदवला तसेच ठिकठिकाणी पथनाट्यांद्वारे जनजागृतीसुध्दा केली.

संपूर्ण देशात वाढत्या अत्याचाराच्या घटनांना कुठेतरी आळा बसला पाहिजे, या प्रमुख उद्देशाने खानापूर फाटा, विद्यापीठ प्रवेशद्वारे, श्री शिवाजी महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर व जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांनी कलकत्ता व बदलापूर येथील घटनांच्या पार्श्वभूमीवर सुंदर असे पथनाट्य सादर केले. त्याद्वारे नागरीकांचे लक्ष वेधून घेतले. यामध्ये सिध्दार्थ खाडे, विकास ससाणे, सुरज शेळके, वैभव झोडपे, बाळू हातागळे, अभिजित भालेराव, विकास राक्षे, राहूल ठोके, गौतम अंबुरे, देविदास टेकूळे, बबलू धबाले, प्रशांत साळवे, बाळासाहेब खंदारे, गोलू नारायणकर भूजंग खंदारे आदी सहभागी झाले होते.

या संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष संजय गायकवाड, युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष अमित भालेराव, रमेश घनघाव, कृष्णा शिंदे, आकाश अहिरे, प्रदीप मुळे, सिध्दार्थ खाडे आदींनी प्रशासनास निवेदन सादर करीत या दोन्ही घटनातील आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी केली.

### लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत


#### जायकवाडीत ३३ टक्के पाणी : सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार

**परभणी,/प्रतिनिधी :** जायकवाडी जलाशयात गुरुवारी सकाळपर्यंत ३३.१० टक्के एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला असून त्यामुळे जायकवाडीच्या लाभक्षेत्रांतर्गत पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचा प्रश्न सुटणार आहे.

यावर्षी जायकवाडीच्या पाणलोट क्षेत्रात पुरेसा पाऊस झाला नाही. त्याचा परिणाम जूलै अखेरपर्यंत जायकवाडीत पाण्याची आवक झाली नाही. परंतु, या महिन्यात नाशिक जिल्ह्यात पडलेल्या पावसामुळे व जायकवाडीच्या वरच्या भागातील छोटी मोठी धरणे ओवरफ्लो झाल्याने जायकवाडीत पाण्याची आवक सुरु झाली. गुरुवारी सकाळपर्यंत मागील ४८ तासात या जलाशयात ४२८८ क्युसेक एवढ्या वेगाने पाण्याची आवक सुरु होती. या जलाशयात ३३.१० टक्के एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. त्यामुळे लाभक्षेत्रांतर्गत खरीप व रब्बी पिकांकरीता पाणी उपलब्ध होणार हे निश्चित झाले आहे.

जायकवाडीच्या लाभक्षेत्रात जवळपास १ लाख ८३ हजार ३२२ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली आहे. विशेषतः २०८ किलो मीटर अंतराच्या डाव्या कालव्यावर १ लाख ४१ हजार ६४० हेक्टर शेत जमीनीचे सिंचन अवलंबून आहे. छत्रपती संभाजी नगर, जालना व परभणी जिल्ह्यातील टेलपर्यंतच्या गावांना जायकवाडीतील पाणी उपलब्ध होत आले आहे. या खरीप व रब्बी हंगामात पाणी पाळी मिळणार आहे.

### बी.आर.कुंडगीर राष्ट्रवादीत दाखल



**परभणी,/प्रतिनिधी :** सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी व गंगाखेड तालुक्याचे भूमीपुत्र बी.आर. कुंडगीर यांनी बुधवारी (दि.२१) मुंबईत ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार व प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार ॲड. विजय गव्हाणे, प्रदेश उपाध्यक्ष भिमराव हत्तीअंबीरे, रमाकांत कुलकर्णी यांच्यासह अन्य उपस्थित होते. कुंडगीर यांच्या पती सौ. करुणाताई कुंडगीर यांनी गेल्या विधानसभा निवडणूकीत गंगाखेड मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीमार्फत निवडणूक लढविली होती. सौ. कुंडगीर या जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या आहेत.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३



## जिंतूर-सेलू मतदार संघातील महिलांचा नाशिक येथे महिला मेळाव्यास प्रतिसाद

**जिंतूर/ प्रतिनिधी-** जिंतूर - सेलु मतदार संघातील महिलांचा नाशिक येथे महिला मेळावा संपन्न झाला होता.

जिंतूर - सेलु मतदार संघातील नाशिक येथे राहणाऱ्या महिलांचा आमदार सौ. मेघना बोर्डीकर- साकोरे यांच्या मार्गदर्शना खाली महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक सौ. दिपालीताई चांडक अध्यक्षा स्वंयशक्ती स्त्री उद्यम फाऊंडेशन नाशिक त्यांनी महिलांना सक्षम बनवण्या साठी महिला बचत गट तसेच छोटे-मोठे व्यवसाय असतील ,पापड उद्योग, पासून ते मोठ- मोठ्या उद्योगापर्यंत कसं आपल्याला काम करता येईल याबाबत त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच ऑनलाईन कॉल वरून जिंतूर सेलू मतदार संघाच्या लोकप्रिय विकासरत आमदार सौ. मेघना बोर्डीकर साकोरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण व इतर योजना बाबत मार्गदर्शन केले तसंच महिला भगिनींशी संवाद साधला. यावेळी उपस्थित मराठवाडा सामाजिक फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष आबासाहेब टरपले, प्रदेशाध्यक्ष डी. एस कातारे पाटील, विभाग प्रमुख पंढरीनाथ कोरडे, महिला अध्यक्षा सौ. शोभा बोबडे तसेच मराठवाडा सामाजिक फाउंडेशनच्या महिला पदाधिकारी व जिंतूर सेलू मतदार संघातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## सर्वसामान्याला शासकीय योजनेचा लाभ मिळाल्याने समाधान

### आ.मेघना साकोरे यांचे प्रतिपादन

**सेलू,/प्रतिनिधी-** केंद्रासह राज्य सरकार सर्वसामान्य घटक पूढे ठेवून काम करत असून शासकिय योजनेचा लाभ सर्वसामान्य लाभार्थ्यापर्यंत पोहचविण्यात सरकार यशस्वी झाले असल्याचे प्रतिपादन आमदार मेघना बोर्डीकर यांनी केले. त्या शूक्रवार ३० रोजी कृषी महाविद्यालयात आयोजीत नोंदणीकृत कामगारांना संसारउपयोगी साहित्या वाटप कार्यक्रमात केले यावेळी डॉ.संजय रोडगे,माऊली ताठे,अँड.दत्तराव कदम,अशोक अंभोरे,रवि डासाळकर,सूंदर गाडेकर,प्रकाश गोरे,गणेश काटकर,अर्जून बोरूळ,वनिता चाफेकर,आदींची उपस्थिती होती.पूढे बोलतांना म्हणाल्या की,देशात भारतीय जनता पक्षाचे सरकार सर्वसामान्य घटकासाठी विविध कल्याणकारी योजना राबवून अमंलबजवणी करत आहेत.तसेच राज्य सरकार देखील सर्व घटकातील नागरीकांसाठी योजना राबवित आहे.मूख्यमंत्री लाडकी बहिण योजनेत ३० हजार बहिणींना लाभ मिळाल्याचा आनंद मिळत आहे. तर आज १ हजार ३३८ नोंदणीकृत कामगारांना संसार उपयोगी साहित्याचे वाटप होत आहे.यामूळे कामगारांना जिवनमान उंचविण्यासाठी थोडा हातभार लागणार आहे.तसेच मतदार संघात प्रत्योक गावात जावून भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच योजनादूत योजनांची माहिती देवून योजनेचे अर्ज भरून घेत आहेत कूठल्याही अडचणी आल्या तर योजनादूतांना संपर्क करावा मतदार संघातील एकही पात्र लाभार्थी शासकिय योजनेपासून वंचीत राहणार नाही याची काळजी घेत असल्याचे यावेळी त्यांनी स्पष्ट केले.

या कर्यक्रमास मोठ्या संख्येने नोंदणीकृत कामगारांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कपिल फुलारी,संदीप बोकन, गणेश सवणे, पप्पू शिंदे, बाळू काजळे ,अजय डासाळकर ,शिवहरी शेवाळे, किशोर कारके, भारत इंद्रोके, संजय भाग्यवंत, अशोक शेलार, कृष्णा गायकवाड,प्रकाश शेरे, महेश टाके, नाना मोताळे, रामा डख, सुनील चव्हाण, विवेक कुरनाळे पांडू पांचाळ ,विठ्ठल कोकर, अशोक ताठे, दीपक चव्हाण, खाजा भाई, बाबासाहेब मुळे, सतीश कापसे ,व्यंकटेश भिसे,श्याम चाफेकर, प्रमोद शेरे,वाल्मीक खुळे,लालू पठाण, गोविंद शर्मा ,अमोल भोसले, अभय महाजन आदींनी पूढाकार घेतला.





**गंगाखेड-** बदलापूर येथील दोन विद्यार्थीनींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडी व मित्रपक्षांच्या वतीने महाराष्ट्र बंद ची हाक देण्यात आली आहे.

## सेलूतील व्यापाऱ्यास १७ लाखाचा चूना

**सेलू/ प्रतिनिधी-** आपले पार्सल इराण येथून आले असून इराण सिमा शूल्क विभागाने पकडले असून आपण ते सोडविण्यासाठी आपण मूंबई क्राईम ब्रांचला फोन करण्याचे सांगत फेक काँल करून सदरिल व्यापा-यास ब्लँक मेल करत त्याच्या खात्यावरील १७ लाख रूपये हडपल्याची घटना सेलूत घडली असल्याने व्यापारी वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाल आहे. शहरातील व्यापारी प्रतिक नंदलाल कुंदनानी रा. पारीख कॉलनी यांना २०ऑंगस्ट २०२४ ला दुपारी ३.३० वाजता व २३ ऑंगस्ट २०२४ ला ३ वाजता फेक काँल करून आरोपीने तुमचे पार्सल इराण येथील सिमा शुल्क विभागाने पकडलेल असुन आपण मुंबई क्राइम ब्रँच कडे तक्रार करा असे म्हणुन ऑनलाइन कॉल जोडुन दिला व सदर कॉलवर हिंदी भाषेमध्ये मी मुंबई क्राइम ब्रँच मधुन बोलतो आपण मनी लाँड्रीगच्या वेगवेगळ्या राज्यातील प्रणालीशी जोडलेले आहात आपल्या विरुध्द निघालेले वारंट तुर्त स्थगित ठेवण्यात आलेली आहे असे म्हणुन फिर्यादीचे आधारकार्ड घेवुन त्याचे नेटबँकिंग लॉगीन करायला लावुन तसेच त्याचे नावे असलेली मुदत ठेव (एफडी) तोडण्यास लावली व सर्व रक्कम फिर्यादीच्या खात्यात जमा झाल्या नंतर बँकेतील कर्मचारी फिर्यादीची खात्यातील माहीती लिक करतील आम्ही पोलीस आहोत तुम्हाला काही होणार नाही असे विश्वासाने भासवुन फिर्यादीस वेगवेगळ्या खात्यात युपीआय, , चेक याव्दारे एकुण १७ लाख ३८हजार ९८ रूपये विश्वासघात करून फसवनुक केली आहे.प्रतिक कूंदनानी यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरूद्ध गून्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा तपास पोलीस निरिक्षक दिपक बोरसे यांच्या मार्गदर्शनात तपास पोलीस उपनिरिक्षक सावंत करत आहेत.

## ४२ वर्षांनी जागवल्या शालेय आठवणी- सांगोरे यांची भेट

**सेलू,/प्रतिनिधी:** ४२ वर्षांनी जागवल्या शालेय आठवणी सुरतचे उद्योजक गणेशभाई सांगोरे यांची सेलूच्या नूतन विद्यालयाला भेट दिली.

सुरत (गुजरात) येथील ईप्रॉम्पट एंटरप्राईजचे उद्योजक आणि सेलू येथील नूतन विद्यालयाचे माजी विद्यार्थी गणेशभाई कन्हैयालालजी सांगोरे यांनी तब्बल ४२ वर्षांनी नूतन विद्यालय परिसरात येऊन शालेय आठवणींना उजाळा दिला. श्री.सांगोरे हे रविवारी, १८ ऑगस्ट रोजी सेलू शहरात आले होते. प्रारंभी शालेय परिसरातील दलित मित्र श्रीरामजी भांगडिया यांच्या पुतळ्याला श्री.सांगोरे यांनी अभिवादन केले. यावेळी सतीश जोशी, बाबासाहेब हेलसकर आदी उपस्थित होते. यानिमित्ताने मनोजकुमार बिनायके यांच्यासह अन्य वर्गमित्रांच्या गाठीभेटी घेत १९८० ते १९८२ या काळातील शालेय आठवणींना त्यांनी उजाळा दिला. श्री सांगोरे यांनी सांगितले की; सुरतमध्ये ईप्रॉम्प्ट एंटरप्राईज या इलेक्ट्रॉनिक उद्योगाद्वारे ७० ते ८० जणांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. या उद्योगाद्वारे ऑनलाईन-युपीएस सिस्टीम्स, सर्वो स्टॅबिलायझर ॲण्ड इंडस्ट्रीयल बॅटरीजच्या उत्पादनाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली जात आहे. या उत्पादनाला चांगला प्रतिसाद आहे. शाळेचा सुंदर परिसर पाहून आनंद झाला असून शाळेच्या विकासासाठी निश्चित सहकार्य राहील असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी एनएमएमएस परीक्षेतील विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन करीत शुभेच्छा दिल्या. शाळेच्या वतीने जेष्ठ शिक्षक बाबासाहेब हेलसकर यांनी श्री सांगोरे व श्री जोशी यांचे स्वागत केले. गुजरातमध्ये उद्योगक्षेत्रात एक यशस्वी उद्योजक म्हणून श्री सांगोरे यांनी ओळख निर्माण केली. नूतन चा लौकिक वाढवला, याचा शाळेचा अभिमान असल्याचे श्री.हेलसकर म्हणाले. यानिमित्ताने शाळेच्या वर्गखोल्या, संपूर्ण परिसर तसेच सेलू शहराचे बदलते स्वरूप पाहूनही उद्योजक सांगोरे यांनी आनंद व्यक्त केला.

### सेलूतील नुतन विद्यालयास उद्योजकांनी लावली उपस्थिती



# शासनाच्या सर्व महत्वाकांक्षी योजनांच्या प्रगतीबाबत दर महिन्याला आढावा घेणार

## जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचेकडून विविध विभागाचा आढावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ ऑगस्ट**

शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व महत्त्वाकांक्षी योजनांच्या प्रगतीबाबत प्रत्येक महिन्याला सर्व विभाग प्रमुखांचा आढावा घेण्यात येणार आहे, अशा सूचना जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आढावा बैठकीत दिल्या.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखाची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी घेतली. यावेळी अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुंभार, गणेश वाघ, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलाश शेळके यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गोयल म्हणाले, दरमहा घेण्यात येणाऱ्या कामकाजाच्या आढाव्याबरोबरच जिल्हा कृती आराखड्याच्या अनुषंगाने करावयाच्या कामाचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजना यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज सवलत योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण यासह महत्त्वाच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. सर्व कार्यालय प्रमुखांनी आपल्या कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची सद्यस्थिती, कामाचा तपशील याची थोडक्यात पीपीटी सादर करावी. याबाबत दरमहा आढावा घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शासनाच्या महत्त्वपूर्ण योजनेतील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे प्राप्त अर्ज काळजीपूर्वक तपासून मंजुरी द्यावी. तसेच आधार लिंक करण्यासाठी पात्र लाभार्थी महिलांचे खाते तात्काळ लिंक करुन घ्यावेत. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत सर्व कार्यालयांनी बेरोजगार पात्र युवक-युवतींच्या राहिलेल्या नियुक्या तात्काळ कराव्यात व तसा अहवाल जिल्हा प्रशासनाकडे सादर करण्याचे आदेश दिले.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज सवलत योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण यासह आदिवासी विकास, जलजीवन, गाळमुक्त धरण, कृषि विभागाच्या योजना, लेक लाडकी योजना, विश्वकर्मा योजना यासह विविध योजनांचा आढावा घेऊन सूचना केल्या आणि सर्व विभाग प्रमुख यांच्याकडून चांगले काम होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# पूर्णा पाटबंधारे विभागाचे कालवे जीर्ण अवस्थेत



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ३१ ऑगस्ट**

पावसाच्या उशिरा झालेल्या आगमनाने व उघडझाप खेळानंतर कसेबसे सिद्धेश्वर धरण भरण्याच्या मार्गावर असले तरीही मात्र येत्या खरीप हंगामात या धरणातील हजारो लिटर पाण्याचा अपव्यय होणार असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. सिद्धेश्वर धरणामधून निघालेला हा मुख्य कालवा अगदी छीन्नविछीन्न झाल्याचे दिसून येत आहे सदर कालव्याला अनेक वर्ष होऊन गेले तरीही तो कालवा देखरेखी अभावी अगदी जीर्ण झालेल्या अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे.

सदरचा कालवा हा सिद्धेश्वर येथून निघून सुखापुरी ब्राह्मणवाडा, गोळेगाव, अंजनवाडी, माथा, जवळा बाजार भागातून जातो तसेच जवळा बाजारभागातून करंजाळा मार्गाने एक मायनर कालवा देखील जातो यामुळे हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली आली आहे २५ ते २० वर्षापासून या कालव्याची दुरावस्था झाली आहे. हा कालवा जागोजागी फुटला असल्यामुळे कालव्यातून हजारो लिटर पाणी वाया जाते आहे. या कालव्यामुळे शेतकऱ्यांसह पाटबंधारे विभागाला मोठा फायदा होतो. यावर्षी धरणात जमा झालेल्या पाणी साठ्यामुळे कालव्याला पाणी सोडले जाणार हे निश्चित आहे. मात्र या काळात सोडल्या जाणारे पाणी हे निश्चित वाया जाणार आहे. सदर कालवा हा उगमस्थानापासून अगदी जवळा बाजार पर्यंत उघडल्या गेला आहे तर अनेक ठिकाणी मोठे मोठे भगदाडे पडले आहे शिवाय अनेक शेतकऱ्यांनी वरून मोटरा न टाकता कालव्या खालील शेतकऱ्यांनी अगदी खालूनच पाईपलाईन केल्याचे दिसून येत आहे शिवाय अनेक किलोमीटर या कालव्याचे सिमेंट व बांधकाम उखडून गेलेले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी कालव्याच्या तळाची व त्यांची भिंतींची माती निघत असून अनेक ठिकाणी भगदाडे पडल्याचे दिसून येत आहे शिवाय सर्व कालव्याने झाडे झुडपे व रोपट्यांची वाढ ही खूप मोठ्या प्रमाणात झाल्याचे पहावयास मिळते आहे. शिवाय अनेक गावाशेजारी कालव्यामध्ये उतरण्यासाठी पायऱ्यांची व्यवस्था केली होती. त्या पायऱ्याशी आता नाहीशा झालेल्या दिसून येत आहेत त्यामुळे कालव्यात पडून अनेक लोकांचे मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. गोळेगाव येथे दोन रस्त्यांना जोडणारा पूल निर्माण केला होता तो पूलही आता नाहीसा झाला असल्याकारणाने विद्यार्थ्यांनाही येण्याजाण्यासाठी दुसऱ्या मार्गाचा अवलंब करावा लागत आहे. त्यामुळे पाटबंधारे विभागाने आज घडीला कालव्याला पाणी नसल्यामुळे हे सर्व कामे केल्यास कालव्यावरील गावांना याचा फायदा होईल तसेच हजारो लिटर व्यर्थ वाया जाणाऱ्या पाण्याचा शेतकऱ्यांना लाभ होईल. संबंधित विभागाने त्वरित लक्ष घालण्याची मागणी कालव्यावरील गावांतील शेतकऱ्यांनी केली आहे.

# तक्रारदारांना ११ लाख ४२ हजार रूपयांचा मुद्देमाल परत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ ऑगस्ट**

शहरासह जिल्ह्यातील पोलिस ठाण्यांतर्गत चोरीच्या घटना उघडकीस आणण्यास पोलिसांना यश आले असून चोरीला गेलेली १० दुचाकी वाहने, ३ मोबाईल, तसेच सोन्याचांदीचे दागिने असा एकूण ११ लाख ४२ हजार रूपयांचा जप्त केलेला मुद्देमाल दि ३१ ऑगस्ट रोजी तक्रारदारांना सन्मानपूर्वक परत करण्यात आला.

तत्कालीन पोलिस अधीक्षक जी श्रीधर यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात चोरीच्या घटनेत पोलिसांनी जप्त केलेला मुद्देमाल तक्रारदारांना संबंधीत पोलिस ठाण्यात बोलावून खात्री करून सन्मानपूर्वक देण्याची मोहीम राबवली. त्यामुळे तक्रारदारांमध्ये समाधान व्यक्त होत होते. हीच संकल्पना विद्यमान पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सुरू ठेवल्याचे दिसत आहे. दि ३१ ऑगस्ट रोजी पोलिसांनी चोरीच्या घटनेत जप्त केलेला मुद्देमाल तक्रारदारांना सन्मानपूर्वक परत केला आहे.

हिंगोली शहरासह जिल्ह्यात मागील काही दिवसांमध्ये दुचाकी चोरी, आठवडी बाजार व सार्वजनिक ठिकाणावरून मोबाईल चोरी, घरफोडीच्या घटना उघडकीस आणून मुद्देमाल जप्त करण्याच्या सुचना दिल्या होत्या. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक १३ पोलिस ठाण्यांना जप्त केलेला मुद्देमाल सन्मानपूर्वक परत करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. याशिवाय स्थागुशाचे एक पथक सपोनि शिवसांब घेवारे, राजेश मलपिल्लू, उपनिरीक्षक विक्रम विठूबोने यांचे पथक स्थापन केले.

या पथकाने सात गुन्ह्यांतील ४ लाख ३० हजार रूपयांचा सोन्या चांदीचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच ३२ हजार रूपये किंमतीचे ३ मोबाईल, ६ लाख ७० हजार रूपये किंमतीच्या १० दुचाकी व इतर असा एकूण ११ लाख ४२ हजार रूपयांचा मुद्देमाल चोरट्यांकडून जप्त केला होता. त्यानंतर पोलिसांनी दुचाकी मालक आणि मोबाईल मालकांची ओळख पटवून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करून सर्व मुद्देमाल परत केला आहे.



**हिंगोली– सेनगाव तालुक्यातील पुसेगाव परिसरात श्री संत जेतालाल महारज मंदिरासमोर २० लाख रूपयांच्या निधीतून सभामंडपाचे बांधकाम करण्यात येणार आहे. भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी स्थानिक विकास निधीतून ही रक्कम दिली असून या कामाचे भूमीपूजन करण्यात आले. यावेळी अॅड के के शिंदे, तालुकाध्यक्ष हिंमत राठोड, माजी सभापती हरिश्चंद्र शिंदे, नारायण राठोड, भूजंग महाराज, विजय धाकतोडे, रामदास चव्हाण, विष्णू राठोड, विश्वनाथ पवार यांच्यासह बंजारा बांधव–भगिनी. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### संतुकपिंपरी येथील ग्रामस्थ वीजेच्या लपंडावामुळे त्रस्त, आंदोलनाचा इशारा

हिंगोली– शहरापासून जवळच असलेल्या संतुक पिंपरी येथे मागील काही दिवसापासून विद्युत प्रवाह वारंवार खंडित होत असून विजेच्या या लपंडावामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. महावितरण कंपनीने विद्युत पुरवठा सुरळीत करावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते अलंकार काशिदे यांनी एका निवेदनाद्वारे महावितरणच्या मुख्य कार्यकारी अभियंत्यांना दिला आहे. मागील काही दिवसापासून संतुक पिंपरी येथे महावितरण कंपनी अघोषित भारनियमन सुरू केले आहे. सकाळी पाच ते दहा सायंकाळी पाच ते सात या वेळेत विद्युत पुरवठा जाणीवपूर्वक बंद करण्यात येत आहे. याविषयी लिंबाळा (मक्ता) सबस्टेशन येथील कर्मचाऱ्यांशी संपर्क साधल्यानंतर ते उडवा उडवीची उत्तरे देत असून सर्वसामान्य नागरिकांना उद्धटपणाची वागणूक देत आहेत. लिंबाळा (मक्ता) येथील महावितरणच्या कर्मचाऱ्यांची मनमानी वाढली असून या मनमानीमुळे ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या कर्मचाऱ्यांना समज द्यावी तसेच संतुक पिंपरी येथील विद्युत पुरवठा सुरळीत करावा अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते अलंकार काशिदे यांनी एका निवेदनाद्वारे महावितरणच्या मुख्य कार्यकारी अभियंत्यांना दिला आहे.

### पोळा सणाच्या कर निमित्त वाई गोरखनाथ मार्गावरील वसमत–औंढा रोडवरील वाहतुक मार्गात बदल

हिंगोली– प्रतिवर्षाप्रमाणे दि. २ सप्टेंबर, २०२४ रोजी पोळा हा सण साजरा करण्यात येणार असून दि. ३ सप्टेंबर, २०२४ रोजी कर हा सण साजरा करण्यात येत आहे. या कर सणानिमित्ताने कुरुंदा पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे वाई येथील गोरखनाथ मंदिरास हिंगोली, लातूर, परभणी व नांदेड जिल्ह्यातील जवळपास १५ हजार ते २० हजार बैलजोड्या दर्शनास व प्रदक्षिणा मारण्यासाठी बैलाचे मालक घेऊन येतात. त्यामुळे वसमत–औंढा रोडवर बैलांची व बैल फिरविण्यासाठी आणणाऱ्या लोकांची बरीच गर्दी होते. हा रस्ता राज्य महामार्ग असल्याने सदर रोडवर वाहतूक मोठ्या प्रमाणावर चालू असते व या दिवशी वाहतूक चालू राहिल्यास अपघात होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने वसमत टी पॉईंट ते नागेशवाडी पर्यंत रहदारीचा रस्ता हा दि. २ सप्टेंबर, २०२४ च्या मध्यरात्रीपासून ते दि. ३ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या मध्यरात्रीपर्यंत बंद करण्यात येऊन नांदेडकडून येणारी वाहतूक वसमत, झिरो फाटा, हट्टा जवळा बाजार मार्गे नागेशवाडी असे पर्यायी मार्गाने औरंगाबादकडे व औरंगाबादकडून नांदेडकडे जाणारी वाहतूक ही नागेशवाडी, जवळा बाजार हट्टा, झिरो फाटा मार्गे वसमत ते नांदेडकडे वळविण्यासाठी आदेश जिल्हादंडाधिकारी, हिंगोली यांनी दिले आहेत. या आदेशाची माहिती पोलीस अधिकारी वाहतूक यांनी ध्वनीक्षेपकाद्वारे प्रसिध्द करावी व सर्व उपविभागीय दंडाधिकारी, तहसीलदार, नगर परिषद, पोलीस स्टेशन कार्यालयाचे नोटीस बोर्डावर डकवून प्रसिध्दी देण्यात यावी. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या विरुध्द नियमानुसार कार्यवाही करावी, असे आदेशही जिल्हादंडाधिकारी, हिंगोली यांनी दिले आहेत.

# आज मराठा सेवा स्थापना दिवस व गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ ऑगस्ट**

मराठा सेवा संघ व संचलीत इतरर कक्षाच्यावतीने येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात रविवार दि १ सप्टेंबर रोजी समाजातील गुणवंत विद्यार्थी तसेच इतर क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा तसेच सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

मराठा सेवा संघाचा स्थापना दिवस आणि गुण गौरव सोहळ्याचे आयोजन सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता मराठा सेवा संघ विद्यार्थी वसतीगृहाच्या प्रांगणात ध्वजारोहन मान्यवरांच्याहस्ते करण्यात येणार आहे. मराठा सेवा संघाचे अध्यक्ष प्रा अर्जुनराव तनपूरे यांची उपस्थिती असणार आहे. तर उद्घाटक म्हणून हिंगोली लोकसभेचे खा नागेश पाटील आष्टीकर यांचे होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी खा अॅड शिवाजीराव माने, आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष अॅड मनोज आखरे, माजी महिला व बालकल्याण सभापती रूपाली पाटील गोरेगावकर, जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, मराठा सेवा संघाचे राज्य उपाध्यक्ष संदीपान जाधव यांची उपस्थिती राहणार आहे.

विशेष उपस्थितीमध्ये शेतकरी नेते डॉ रमेश शिंदे, डॉ यशवंत पवार, डॉ कौसल्या सावळे, डॉ संतोष सावळे, डॉ सोनाली गोपाल कदम, डॉ जारे, माजी जि प सदस्या मालती कोरडे, डॉ माधुरी शिंदे, डॉ संदीप शिंदे, डॉ पवार, डा् गजानन शिंदे, डॉ कल्याणी जाधव, माधव कोरडे, संतोष आखरे, कुणाल खडसे, सुनीता रोडगे, नंदकुमार इंगळे, महेश राखुंडे, कैलास डिडाळे, राजकुमार वायचाळ, व्ही जी वानखेडे, सुधाकर बल्लाळ, माधव जाधव, राज कऱ्हाळे, शिवराय सरनाईक, परसराम हेंबाडे, पंडीत शिरसाट, खंडेराव सरनाईक, शिवाजीराव ढोकर, साधना हेंबाडे, पंडीत अवचार आदींची उपस्थिती असणार आहे.

मराठा सेवा संघ स्थापना दिवस व गुण गौरव समारंभात गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थीनी, समाजातील क्रिडा, कला, साहीत्य, शेती, शिक्षण, सांस्कृतीक, राजकीय अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच आदर्श पुरस्कार प्राप्त मान्यवरांचाही सत्कार करण्यात येणार आहे. कृषी व समाजसेवा क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांचा सत्कारही करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मराठा सेवा संघ संलग्नी कक्षाच्यावतीने करण्यात आले आहे.

# राणीसती मंदिराज आज कृष्ण जन्माष्टमी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ ऑगस्ट**

आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ अर्थात इस्कॉनच्या हिंगोली शाखेच्या वतीने १ सप्टेंबर ला खटकाळी बायपास राणी सती मंदिर गंगा नगर या ठिकाणी श्रीकृष्ण जन्माष्टमीचे आयोजन करण्यात आले आहे.

हिंगोली येथे इस्कॉनला मोठा प्रतिसाद मिळत आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सवातमहाभिषेक, नाम संकीर्तन, श्रीकृष्ण जन्म कथा वाचन, महाआरती, महाप्रसाद व विविध धार्मिक अध्यात्मिक कार्यक्रमासह आयोजित करण्यात आले आहे. याप्रसंगी प्रबोधनकार श्रीमान रुद्रनाथ प्रभुजी यांचे व्याख्यान होणार आहे. इस्कॉन मंदिर निमर्ाण योजनेचा संकल्प करण्यात आला असून भुमिदान, अर्थदान, अन्नदान आदीसाठी दानशूर भक्त भाविकांनी स्वयंस्फुर्तपणे शाखेशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. दि.१ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता नामसंकीर्तनाने सुरवात होवून विविध कार्यक्रमानंतर दुपारी २ च्या दरम्यान महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी भक्ती मार्गातील सर्व निमंत्रितांनी सहभागी आवाहन इस्कॉन हिंगोली शाखेच्या करण्यात आले आहे.

# निवड झाल्याबद्दल नगरसेवक बिरजु यादव यांचेकडून तरूणांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ ऑगस्ट**

शहरातील रिसाला बाजार भागातील दोन तरूणांची अनुक्रमे रेल्वे विभाग आणि पोलीस दलात निवड झाल्याबद्दल माजी उपनगराध्यक्ष बिरजु यादव यांनी तरूणांचा सत्कार केला.

रिसाला बाजार भागातील माजी उपनगराध्यक्ष बिरजू यादव यांच्या निवासस्थानी या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नांदेव रेल्वे विभागात अक्षय शंकर यादव यांची तर अकोला पोलिस दलात शेख समीर शेख सत्तार यांची नुकतीच निवड झाल्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पहार घालून माजी उपनगराध्यक्ष बिरजू यादव यांनी सत्कार केला. यावेळी शेख खाज शेख दौलत, सय्यद बशीर स. लाल, अकबर भाई, मोबीन खान, शेख शेरू, शेख मुख्तार, एजास पठाण, इरफान पठाण, वसीम, मुन्ना यादव, रितीक यादव, आकाश यादव, मोहसीन कमलेश यादव, दयाल यादव, युवराज यादव, अमोल टोंपे यांच्यासह रिसाला बाजार येथील नागरिकांची उपस्थिती होती.

# इमर्जन्सी चित्रपटाला राज्यात बंदी घालण्याची प्रशासनाकडे मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ ऑगस्ट**

अभिनेत्री कंगना रनौत यांनी निर्देशीत केलेला इमर्जन्सी या चित्रपटाला राज्यात बंदी घालण्यात यावी अशा मागणीचे निवेदन सिख सिकलकरी समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी यांचेमार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनात केली आहे.

निवेदनात नमुद केले आहे की, या चित्रपटाच्या माध्यमातून सख समाजाला चुकीच्या पध्दतीने दर्शवले जात आहे. देश विदेशात सिख समाजातर्फे चित्रपटाला विरोध केला जात आहे. सिख समाजाची होणारी बद्नानी कदापीही सहन करणार नाहीत. चित्रपटामुळे देशातील वातावरण खराब होऊन देशाची अखंडता खंडीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या चित्रपटाला संपूर्ण महाराष्ट्रात बंदी घालण्यात यावी. चित्रपट प्रदर्शीत झाल्यास राज्यात सर्व चित्रपट गृहाबाहेर सिख समाजाच्यावतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर ठाकुरसिंग बावरी, सुखबीरसिंग अलग, सतनामसिंग टाक, सुरजसिंग बावरी, जुगनसिंग टाक, रविंद्रसिंग बावरी, जागारसिंग टाक, देवासिंग बावरी, सोनुसिंग टाक, राजसिंग बावरी, भगतसिंग टाक, प्रेमसिंग टाक, अजयसिंग टाक, रामसिंग टाक आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सरकारच्या कल्याणकारी योजना आणि अभूतपूर्व विकासकामामुळे किनवट मतदारसंघात पुन्हा कमळच फुलणार

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,३१ ऑगस्ट -**

किनवट विधानसभेचे कार्यकुशल आमदार भीमराव केराम यांनी मागील दोनच वर्षाच्या कार्यकाळात केलेल्या विकास कामांना प्रभावित होऊन किनवट माहूर तालुक्यातील विविध पक्षातील प्रमुख पदाधिकारी तसेच ग्रामीण भागातील कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने भारतीय जनता पक्षाशी जुडताना दिसत असून या मतदारसंघातील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले ग्रामीण रस्ते, पूल, सिंचन तसेच पायाभूत विकासाची काम कायमस्वरूपी मार्गी लागल्यामुळे विकास कामाच्या जोरावर पुन्हा एकदा या मतदारसंघात कमळच फुलणार अशी चर्चा सर्वसामान्य जनतेतून सुरु आहे.

## आ. भीमराव केराम यांचा आत्मविश्वास


आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने किनवट मतदार संघात भारतीय जनता पक्षाने जोरदार मोर्चे बांधणी सुरू केली आहे. किनवट माहूर तालुक्यात वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले ग्रामीण रस्ते,महत्त्वाचे पूल,गावांतर्गत सिमेंट रस्ते नाल्या समाज मंदिर, उच्चपातळी बांधाऱ्याच्या माध्यमातून शेतीसिंचन, आरोग्य आदी मूलभूत कामे आ भीमराव केराम यांनी अवघ्या दोनच वर्षात मार्गी लावली आहेत. देवस्थान, मंदिरे ,परिसराचा विकास करून त्यांनी पर्यटणाला मोठ्या प्रमाणात चालना दिली आहे.किनवट शहरातील महापुरुषांचे नवीन पुतळे उभारणी व सुशोभीकरनासाठी कोट्यावधीरु चा निधी खेचून आणला. बाजारपेठ व उद्योगवाढ करण्याच्या हेतूने त्यांनी ग्रामीण भागातील जवळपास सर्वच रस्ते चकाचक केले असून रस्त्यावरील छोटे मोठे पूल ठराविक वेळेत पूर्ण झाल्याने शालेय विद्यार्थी व नागरिकांची मोठी सोय झाली आहे. आ भीमराव केराम यांनी त्यांच्या स्थानिक विकास निधीतून किनवट माहूर तालुक्यातील गाव खेड्यात व तांड्यात सिमेंटरस्ते नाल्या समाज मंदिर, शाळा मंदिर परिसरात पेवर ब्लॉक करून ग्रामीण भागाचा कायापालट केला आहे.सर्वांगीण विकास कामामुळे ग्रामीण भागातील जनतेमध्ये भाजपा सरकार बद्दल प्रचंड सहानुभूती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे केंद्र व राज्य सरकारने लागू केलेल्या योजना सर्वच समाज घटकातील गरजू व पात्र नागरिक महिलांपर्यंत पोहचल्याने विविध पक्षातील नेते, कार्यकर्ते व सामान्य नागरिक भाजपासी जुडताना दिसत आहेत. उज्वला गॅस योजना शेतकरी सन्मान निधी तसेच लाडकी बहीण सारख्या महत्वकांक्षी योजना शेतकरी, मजूरदार कामगार व दुर्बल घटकातील महिलासाठी वरदान ठरल्या आहेत. मागच्या दोन वर्षाच्या कार्यकाळात किनवट माहूर तालुक्यात झालेली विकास कामे आणि केंद्र व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनामुळे पुन्हा एकदा या मतदारसंघात कमळच फुलणार आहे असा आशावाद आमदार भीमराव केराम यांनी व्यक्त केला असून विकासकामाच्या जोरावर विजय आपलाच आहे असे स्पष्ट करत त्यांनी माहूर येथील पक्षाच्या विस्तारित अधिवेशनात आगामी विधानसभा निवडणूकिचे रनसिंग फुंकले आहे.



# राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या समवेत होणार कॉम्रेड उज्वला पडलवार यांची संस्मरणीय भेट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,३१ ऑगस्ट -**

महिला सबलीकरणासाठी गेल्या अनेक वर्षापासून भरीव योगदान देणाऱ्या महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील २५ महिलांचा राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार असून राष्ट्रपती सोबत संस्मरणीय भेटीच्या सोहळ्यात नांदेडच्या कॉ. उज्वला पडलवार यांचा समावेश करण्यात आला आहे . दिनांक ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी मुंबई येथील राजभवनात हा दिमाखदार सोहळा पार पडणार असल्याची माहिती लोकमत सखी मंचच्या वतीने देण्यात आली आहे .



कष्टकरी ,शेतकरी ,आशा वर्कर, गटप्रवर्तक, घरकामगार ,असंघटित कामगार महिलांच्या न्याय हक्कासाठी गेल्या एक दशकावून अधिक काळ संघर्ष करणाऱ्या कॉम्रेड उज्वला पडलवार यांच्या कार्याची पावती म्हणून दैनिक लोकमत संखी मंचच्या वतीने महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या हस्ते दिनांक ३ सप्टेंबर रोजी गौरव करण्यात येणार आहे . राज्यातील महिलांच्या सबलीकरणासाठी आणि सशक्तीकरणासाठी योगदान देणाऱ्या गोवा आणि महाराष्ट्र राज्यातील केवळ २५ महिलांचाच सन्मान करण्यात येणार असून यात कॉम्रेड उज्वला पडलवार यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे कष्टकरी, शोषित, पीडित , वंचितांच्या न्याय हक्कासाठी गाळलेल्या घामाचा सुगंध थेट आता राजभवना पर्यंत पोहोचणार आहे. त्यामुळे या निवडीबद्दल कॉम्रेड उज्वला पडलवार यांचे विविध क्षेत्रातील मान्यवर आणि ज्यांच्यासाठी त्यांनी कष्ट उपसले त्या सर्व कष्टकरी महिला , असंघटित कामगार महिलांकडून अभिनंदन होत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### वाढदिवसानिमित्त वाचनालयास ग्रंथ भेट

**नांदेड**-ज्येष्ठ पत्रकार आनंद कल्याणकर यांनी आपल्या ६२ व्या वाढदिवसानिमित्त नायगाव तालुक्यातील बरबडा इथल्या इंदिरा सार्वजनिक वाचनालयास ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम आणि डॉ. सुरेश सावंत यांच्या हस्ते ६२ ग्रंथ भेट दिले आहेत. दत्त प्रभू प्राथमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक महेश शिवाजीराव धर्माधिकारी यांनी यांनी ते स्वीकारले. पत्रकार आनंद कल्याणकर यांच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे कौतुक मित्र परिवाराने केले आहे.कल्याणकर यांनी यापूर्वी राजर्षी शाहू विद्यालय, वसंतनगर आणि राष्ट्रमाता इंदिरा गांधी हायस्कूल, तरोडा बुद्रुक या शाळांना ग्रंथ भेट म्हणून दिले आहेत. यावेळी दिगंबरराव क्षीरसागर, साहित्यिक डॉ. भगवान अंजनीकर, पत्रकार पंढरीनाथ बोकारे, बालाजी पवार, महावीर दुट्टे, कानोले, सुरनर, विवेक मोरे, महाजन आदी उपस्थित होते.

### हाणेगाव ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभा संपन्न ; तंटामुक्ती अध्यक्षपदी योगेश देशमुख

**हाणेगाव**-हाणेगाव येथे आज दि.३१ रोजी ग्रामसचीवालयात ग्रामसभा आयोजीत करण्यात आली होती यावेळी अध्यक्षस्थानी सरपंच सौ. शारदादेवी शंकराराव राठोड उपसरपंच मुजीप चमकुडे ग्रामविकास अधीकारी अमोलकुमार जाधव ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य उपस्थीत होते. यावेळी गावातील असंख्य नागरीकांच्या उपस्थीतीत ग्रामसभा संपन्न झाली यामध्ये एकमुखी बिनविरोध योगेश आबासाहेब देशमुख यांची महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी स्थानीक नगरीकांनी स्थानीक समस्यांचे वेगवेगळ्या समस्या वेगवेगळ्या परीने मांडले त्यात शिवसेना कार्यकर्ते प्रविन इनामदार राष्ट्रीवादीचे राजेश पंदरगे बालाजी नाईकवाडे युवराज स्वंतकर यांनी सर्वप्रथम तंटामुक्ती अध्यक्ष पदाची सुचना केली आणि सर्व नागरीकांनी एकमुखी हात वर करुन बिनविरोध निवडीसाठी सहकार्य केले तर गावातील आनेक नगरीकांनी रोड नाली पाणी विज आदी समस्यांचे पाढा वाचले यावेळी ग्रामविकास अधीकारी यांनी सर्वांच्या समस्यांचे नोंद करुन निराकरण करण्याचे आश्वासन दिले आहे. आतापर्यंतच्या इतीहासात ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभेत स्थानीक नागरीकांची लक्षणीय उपस्थीती होती तर स्थानीक नगरीकांनी शासनाच्या विवीध योजनाची शांतपणे माहीती ऐकुन घेतले तर यावेळी या ग्रामसभेत माजी ग्रा.पं.सरपंच प्रशांत देशमुख,शंकरराव राठोड,ग्रा.पं.सदस्य विवेक पडकंठवार,शंकरराव राठोड,रमेश सा.राणे,वजीयोदीन चमकुडे,शिवाजी राठोड,उमाकांत पंचगले,किशोर आडेकर,विलास भंडारे,मयुर पाटील,समद चौधरी,अयुब पठाण,शादुल बागवान,नयुम चौधरी,धनाजी होटले,व्यंकट बोईनवाड,अशोक टोके,वसंत आडेकर,राजकुमार हंदीखेरे,मुख्तार पटेल आदीजन यावेळी उपस्थीत होते.



### तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत स्नेहा पाटीलने पटकावला प्रथम क्रमांक

**लोहा**-दिग्रस (खु) येथील श्री नाईक विद्या मंदिर शाळेतील इयत्ता ८ वर्गातील विद्यार्थी कु. स्नेहा पाटील हिने तालुकास्तरीय शालेय मुलीच्या कुस्ती क्रिडा स्पर्धात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. १४ वयोगटातील ५४ किलो वजन गटात बाजी मारली आहे. या यशाबदल शाळेचे मुख्याध्यापक गायकवाड के.डी, सहशिक्षक सतीश देवकत्ते, खोकले पी.एस, राम कल्याणकर, अविनाश पांचाळ, दहिफळे पी.जी, जयराम टाले, सतीश कल्याणकर, चंद्रकांत कल्याणकर, आत्माराम गुट्टे आदिंनी अभिनंदन केले आहेत.

### राजेश्वर मुत्तेपवार यांचे निधन

**नांदेड**-इंदिरा गांधी हायस्कूल सिडको नांदेडचे सहशिक्षक तथा डॉ. शंकरराव चव्हाण शारदा धनवर्धिनी पतसंस्थेचे खजिनदार महेश मुत्तेपवार यांचे वडील राजेश्वर गंगाधरराव मुत्तेपवार यांचे आज वयाच्या ७५ या वर्षी दुःखद निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा सायंकाळी सात वाजता श्रीनगर रामराव पवार मार्ग येथील त्यांच्या निवासस्थानाहून निघणार असून सायंकाळी साडेसात वाजता गोवर्धन घाट येथे दिवंगत राजेश्वर मतेपवार यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत . पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे नांदेड जिल्हा समन्वय रवींद्र संगनवार यांचे ते मावसे होत.



### पंडित प्रदीप मिश्रा यांनी पूजन केलेले शिवलिंग दर्शनासाठी उपलब्ध

**नांदेड**-नांदेड येथे नुकत्याच संपन्न झालेल्या शिवमहापुराण कथेत आंतरराष्ट्रीय कथा वाचक पंडित प्रदीप मिश्रा यांनी शिवमहापुराण कथेच्या वेळी दररोज ज्या शिवलिंगाची पूजा केली, ते शिवलिंग मॉ तुळजा भवानी कावड यात्रेत भाविकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आले आहे.

# पोळा सण वृक्षतोड न करता पर्यावरण पूरक साजरा करावा : नारायण कदम

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव ,३१ ऑगस्ट -**

येणाऱ्या पोळा सणानिमित्त मेढीसाठी पळस व उबरांच्या फांद्या तोडून दारापुढे उभ्या करून त्याची पूजा केली जाते. यामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्यामुळे भविष्यात याचा आपणास फटका बसू शकतो याची प्रचिती आपल्यास कोरोनाच्या काळात आली होती म्हणून वृक्षतोड न करता आपल्या घरासमोर त्या दिवशी वृक्षारोपण करून पोळा हा सण मोठ्या उत्साहात साजरा करावा असे आवाहन सर्व जनतेस सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा निसर्ग व सामाजिक पर्यावरण निवारण मंडळाचे तालुकाध्यक्ष नारायण कदम यांनी केले.



पोळा सणानिमित्त मृत फांद्यांची पूजा केली जाते. याबाबत कदम यांनी वयोवृद्ध, तज्ञ पंडित, अभ्यासक यांना विचारले असता त्यात कोणती धार्मिक शास्त्रीय कारण मिळाले नाही . वृक्षतोडीमुळे प्रदूषित झालेल्या काळात ही प्रथा ( रुढी ) योग्य आहे का ? म्हणून आपण रोपवाटिकेतून कोणतेही दोन झाड घेऊन मुख्य चौकटीला लावून या जिवंत झाडांमध्ये देव पाहून याची पूजा करावी. लग्नासाठी हिरवा मंडप, दसऱ्याला आपटा, हरितालिकेला पाने, दिवाळी लक्ष्मीपूजन, तोरणे ,पाडवा तोरण यासाठी वृक्षतोड करून आपण पर्यावरणाचा नाश करत आहोत. तरी आपल्या प्रत्येक सणानिमित्त मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे गरजेचे असून ज्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन करून पर्यावरण प्रदूषण टाळण्यात यावे असे आवाहन कदम यांनी केले.

# हदगाव विधानसभेत-मंडळ प्रभारीपदी भागवत देवसरकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,३१ ऑगस्ट -**

भारतीय जनता पार्टीने हदगाव-हिमायतनगर विधानसभेच्या हिमायतनगर मंडळ प्रभारीपदी संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते भागवत देवसरकर यांची निवड केली आहे,भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर, विक्रांत पाटील, मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष ॲड.किशोर देशमुख यांनी निवड केली आहे.



हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघात प्रत्येक बूथ वर प्रवास करून पदाधिकारी बूथ प्रमुख शक्ती केंद्रप्रमुख व बुध वरील कार्यकर्त्याची मते जाणून घेऊन येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकाकरिता बूथसक्षम करण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी तालुक्यात प्रवास करून प्रभारी पदाच्या माध्यमातून काम करण्यात येणार आहे, निवडणुकीच्या तोंडावर भारतीय जनता पार्टीने मोठी जबाबदारी देऊन हदगाव हिमायतनगर विधानसभेत भारतीय जनता पार्टीचे पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी भाजपाने कंबर कसली आहे.

**पक्ष संघटन वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करणार : भागवत देवसरकर**

भारतीय जनता पार्टीने माझी हदगाव विधानसभेच्या हिमायतनगर मंडळ प्रभारीपदी निवड करून काम करण्याची संधी दिल्याबद्दल पक्षश्रेष्ठीचा आभारी आहे. यापुढील काळात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री गिरीश महाजन, खासदार अशोकराव चव्हाण, खासदार अजित गोपछडे, माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, मराठवाडा संघटनमंत्री संजयभाऊ कौडगे, जिल्हाध्यक्ष ॲड.किशोर देशमुख मार्गदर्शनात व हदगाव-हिमायतनगर तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी समन्वय ठेवत भारतीय जनता पार्टीचे पक्ष संघटन वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे भागवत देवसरकर म्हणाले.

# अनुज अग्रवाल याची जागतिक पातळीवर चमकदार कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,३१ ऑगस्ट -**

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेमध्ये तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन्स (EXTC)मध्ये शिक्षण घेणारा विद्यार्थी अनुज अग्रवाल, यांनी देश पातळीवर एस.जी.जी.एस. संस्थेची गुंणवत्ता सिद्ध करत गुरुजनांचे मार्गदर्शन आणि स्वतः चे कठोर परिश्रम व जिद्धीच्या जोरावर अत्यंत स्पर्धात्मक असलेल्या लिनक्स (Linux) फाउंडेशन मेंटॉरशिप, एल.एफ.एक्स. (LFX) प्रोग्राम मधील यशाला गवसणी घालत जागतिक पातळीवर चमकदार कामगिरी केल्याबद्दल संस्थेचे संचालक डॉ.मनेश कोकरे यांनी सत्कार केला.

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी नांदेड येथील तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन्स (EXTC)मध्ये शिक्षण घेणारा विद्यार्थी अनुज अग्रवाल, यांनी देश पातळीवर चमकदार कामगिरी विशेष निवड प्रक्रियेत तांत्रिक कौशल्याचा कस लाऊन.अनुज आग्रवालने या जागतिक पातळीवरील स्पर्धेत अगदी कमी अर्जदार निवडले जातात आणि बहुतेक निवडी पारंपारिकपणे जगातील प्रतिष्ठीत संस्था व आय.आय.टी. (IITs) मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्या मधून होतात. प्रतिष्ठित क्लाउड नेटिव्ह कंप्युटिंग फाउंडेशन (CNCF) प्रकल्पावर काम करत, एस.जी.जी.एस. संस्थेमध्ये तृतीय वर्षात शिक्षण घेणारा विद्यार्थी अनुज अग्रवाल हा एल.एफ.एक्स. (LFX) प्रोग्राम मेंटॉरशिप टर्म-३, २०२४ साठी निवड झालेल्या महाराष्ट्रातील फक्त २ भारतीयांपैकी एक ठरला आहे. या स्पर्धेत जगभरातून जवळ पास १०० ते १५० तर भारतातील २५ ते ३० विद्यार्थ्याची निवड होत असते. अनुज अग्रवाल यास संस्थेचे संचालक डॉ. मनेश ब. कोकरे यांचेसह इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन्स विभागीतील प्राध्यापकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभल्यामुळे.त्याच्या या यशा बद्धल संस्थेचे संचालक डॉ. मनेश ब. कोकरे, विविध अधिष्ठाता, विभाग प्रमुख, कर्मचारी, व विद्यार्थी यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# डापरवाड कुटुंबाला दादाराव पाटील ढगे यांची आर्थिक मदत



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,३१ ऑगस्ट -**

मुदखेड तालुक्यातील बारड येथील कवळे मार्केटच्या बाजूस असलेले मजूर डापरवाड कुटुंबाचे घर दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागल्याने घर जळून खाक झाले असुन या आगीत घरातील जीवनावश्यक वस्तूंची राख झाली असून रोजमजुरदार कुटुंब उघड्यावर आले.या घटनेची माहिती भोकर विधानसभेतील दान महर्षी सामाजिक कार्यकर्ते दादाराव पाटील ढगे यांना मिळताच दि.३० ऑगस्ट रोजी बापुराव डापरवाड कुटुंबीयांची भेट घेऊन त्या कुटुंबीयाला आधार म्हणून २१,००० हाजाराची आर्थिक मदत करण्यात आली.

हि आर्थिक मदत केल्याबद्दल डापरवाड कुटुंबीय व गावकऱ्यांच्या वतीने दादाराव पाटील ढगे यांचे आभार मानण्यात आले. यावेळी उपस्थित असलेले भुजंगराव पाटील ढगे, बालाजी पाटील नागेलीकर,ओमकार पाटील ढगे, आनंद पाटील मगरे, माधव पाटील ढगे, मुदखेड काग्रेस कमिटि तालुका अध्यक्ष प्रताप देशमुख, संदिप देशमुख,सतिष पाटील डोंगरगावकर, रामकिशन माने,गजानन लोमटे,महेश मुलंगे,प्रदिप सवरकर,लोकेश देशमुख, दिनेश आठवले,अमोल आठवले,विशाल वसुमते, काशिनाथ शिंदे, सतिश व्यवहारे यासह गावकऱ्यांची उपस्थिती होती.

# वयोश्री व तिर्थदर्शन योजनांच्या शिबीराची सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,३१ ऑगस्ट -**

झोपडपट्टी भागात राज्य शासनाच्या लाभकारी योजना गरीब गरजू लोकांना व खरे लाभार्थना सरकारचे सर्व लाभकारी योजना पोहचावी या संकल्पनेतून भास्कर अण्णा तुम्मा यांनी नांदेड मध्ये आज दिनांक ३० ऑगस्ट रोजी गंगाचाळ येथील मार्कंडेय मंदिर मध्ये सर्व समाजातील ज्येष्ठ नागरिकांसाठी मा.मुख्यमंत्री वयोश्री व तिर्थदर्शन योजनांच्या शिबीर घेण्यात आले.

या शिबीर मध्ये नांदेड समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त शिवानंद निमगरे, समाज कल्याण विभागाचे अधिकारी सुजाता पोहरे, दिगंबर पोतुलवार, विठ्ठल दुगळे, विजय पकाने, ज्योती जाधव या सर्व प्रमुख अधिकारी उपस्थितित राहून सर्व ज्येष्ठ नागरिकांना योजनेची सविस्तर माहिती सांगून मोफत फॉर्म भरून स्वीकारण्यात आले असता या शिबीर मध्ये भास्कर अण्णा मित्र मंडळाचे प्रमुख पदाधिकारी आणि मोठ्या संख्येनी जमलेल्या लाभार्थी ज्येष्ठ नागरिकांच्या खूप मोठी गर्दी होती.

भास्कर अण्णा तुम्मा यांनी शासनाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोश्री व तीर्थ दर्शन योजनांबद्दल शासनाचे प्रथम धन्यवाद मानले व इच्छुक उपस्थितांना सर्वांनी सहभाग नोंदऊन या संधिचा फायदा घ्यावा असे आवाहान त्यांनी केले. झोपडपट्टी भागात आलेले समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त शिवानंद निमगरे व त्यांचे सर्व अधिकारी यांना विशेष आभार व्यक्त केले. या नंतर शिबीरा मध्ये आपले योगदान देण्यासाठी आलेले समाज कल्याणचे सर्व अधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले आहे.शासनाचे योजना झोपडपट्टी भागात घेऊन येण्यासाठी परिश्रम घेऊन शिबीर आयोजन केल्याबद्दल भास्कर अण्णा तुम्मा यांच्ये जिल्हा समाज कल्याण विगागाच्या तर्फे सत्कार करण्यात आला. या नंतर नांदेड जिल्हा समाज कल्याण सहायक आयुक्त शिवानंद निमगरे यांनी समाज कल्याण विगागाच्या वतिने सर्वतोपरी ज्येष्ठनागरिकांना सहकार्य करण्याचे अभिवचण दिले. अत्यंत खुमसदार शैलीत शासनाच्या सर्व योजनांबद्धल इतंभूत माहिती दिली. शिबीर साठीचा वेळही वाढऊन दिला व सर्वांनी या योजनेचा फायदा घेण्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रम मध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या फॉर्म भरून व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते गुर्रम श्रीनिवास मल्लेशम, अविनाश जिंदम, बुर्ला कनकराज, चिप्पा शुभम, उप्परपेल्ली सत्यानंद, चिप्पा हरीश, उप्परपेल्ली बालकिशन व भास्कर अण्णा मित्र मंडळाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# श्री केदार जगद्गुरु यांच्या श्रावणमास अनुष्ठान सोहळ्याची ४ सप्टेबर रोजी सांगता

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,३१ ऑगस्ट -**

श्री हिमवत् केदार वैराग्य सिंहासनाधिश्वर केदारनाथ रावल श्री श्री श्री १००८, श्री केदार जगद्गुरु भीमाशंकरलिंग शिवाचार्य (उत्तराखंड) यांच्या ५२ व्या श्रावण मास अनुष्ठान समाप्ती सोहळा बुधवार दि. ४ सप्टेबर रोजी होणार आहे.



हा श्रावण मास अनुष्ठान समाप्ती सोहळा गुरु दशमुख आश्रम भीमाशंकरनगर गोपाळचावडी नवीन नांदेड येथे होणार आहे. त्या अनुषंगाने ५ ऑगस्टपासून सुरु झालेल्या श्रावणमास अनुष्ठान कार्यक्रमनिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांची मेजवाणी सुरु आहे. या निमित्ताने दि.४ सप्टेंबर रोजी सकाळी ८ दु.१२ यावेळात इष्टलिंग महापुजा, दु.१२ ते २ यावेळात धर्मसभा आणि मान्यवरांचा सत्कार होणार आहे. त्यानंतर दु. २ ते ६ यावेळात महाप्रसादाचा कार्यक्रम होइल. या सर्व कार्यक्रमाचा भक्तगणांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन श्री गुरुदशमुखाश्रम गोपाळचावडी भक्तमंडळी यांनी केले आहे.

# वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने खा.गोपछडे आणि खा.काळगे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,३१ ऑगस्ट -**

नवनिर्वाचित लोकसभा सदस्य आणि राज्यसभा सदस्य असणाऱ्या खासदारांचा नागरी सत्काराचे आयोजन वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने दि.८ सप्टेंबर रोज रविवारी गुरूवर्यांच्या उपस्थितीत राजेंद्र हुरणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला आहे.



वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने खा. डॉ. अजित गोपछडे आणि खा. डॉ. शिवाजी काळगे यांचाा समाजाच्यावतीने भव्य नागरी सत्काराचे आयोजन नांदेड येथे करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यासाठी दिव्य सानिध्य म्हणून श्री. ष.ब्र. १०८ सोमलिंग शिवाचार्य महाराज(बिचकुंदा),श्री. ष.ब्र. १०८ दिगंबर शिवाचार्य महाराज(वसमत), श्री. ष.ब्र. १०८ डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज(मुखेड),श्री. ष.ब्र. १०८ सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज(बेटमोगरा),श्री. ष.ब्र. १०८ करबसव शिवाचार्य महाराज(वसमत), श्री. ष.ब्र. १०८ शंभुलिंग शिवाचार्य महाराज(उदगीर),श्री. ष.ब्र. १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज(तमलूर), श्री. ष.ब्र. १०८ काशिनाथ शिवाचार्य महाराज(पाथरी), श्री. ष.ब्र. १०८ शिवचैतन्य शिवाचार्य महाराज(हदगाव), श्री. ष.ब्र. १०८ गुरुपादेश्वर शिवाचार्य महाराज(गिरगाव), श्री. ष.ब्र. १०८ विरुपाक्ष शिवाचार्य महाराज(मांजरसुंबा),श्री. ष.ब्र. १०८ महादेव शिवाचार्य महाराज(वाई), श्री. ष.ब्र. १०८ विश्र्वचैतन्य शिवाचार्य महाराज(आष्टी),श्री. ष.ब्र. १०८ महादेव शिवाचार्य महाराज, कळमनुरी, श्री. ष.ब्र. १०८ सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज(साखरखेर्डा)श्री डॉ. बसव जय चंद्र स्वामीजी,श्री शा.ब्रा.डॉ. वागीश पंडिताराध्य शिवाचार्य, स्वामीजी श्री विभव विद्या शंकर स्वामीजी (कर्नाटक)आदी उपस्थित लाभणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष नांदेडभूषण राजेंद्र हुरणे तर विशेष उपस्थितीत डॉ. त्र्यंबक दापकेकर, मुख्य अभियंता इंजि. बसवराज पांढरे, उपायुक्त वस्तु व सेवाकर विभाग निलेश शेवाळकर, आयकर विभागाचे उपायुक्त प्रसाद मेनकुदळे,ओंकारेश्वर काचंनगिरे उपायुक्त सिमा कर, उपजिल्हाधिकारी प्रविण मेगशेट्टे, उपजिल्हाधिकारी सौ.सुप्रिया डांगे, (मेनकुदळे), जिल्हा शैल्य चिकित्सक डॉ.निळकंठ भोसीकर, सहाय्यक मुख्य अभियंता जलसंपदा विभाग इंजि.राजू देशमुख, लेखाधिकीर प्रादेशिक परिवहन विभाग विनायक शिराळे, कार्यकारी अभियंता सा.बां. इंजि.प्रशांत कोरे, कार्यकारी अभियंता अमोल पाटील, तहसीलदार नेमाजी देवणे, लोहाचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. हा कार्यक्रम दि.८ सप्टेंबर रोज रविवारी सकाळी ११ वाजता लिंगैक्य गणपतराव मोरगे सभागृह भक्ती लॉन्स मालेगाव रोड नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.